# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग



## वार्षिक अहवाल २०१६-२०१७

MAHARASHTRA ELECTRICITY REGULATORY COMMISSION

।। आदित्य हृदयम ।।

मविनिआ

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## वार्षिक अहवाल
## २०१६-१७

# अनुक्रमणिका


**१. आयोगाची स्थापना व कार्ये** ..... १

**२. आयोगाचा संरचनात्मक तक्ता** ..... २

२.१ अध्यक्ष व सदस्य ..... २

२.२ आयोगाच्या आस्थापनेवरील कर्मचारी ..... २

२.३ सल्लागार ..... २

**३. राज्य सल्लागार समिती** ..... ३

**४. महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्रातील परिस्थिती** ..... ४

४.१ वीज निर्मिती ..... ४

४.२ विजेचे पारेषण ..... ५

४.३ विजेचे वितरण ..... ६

४.४ नूतनशील ऊर्जा ..... ७

**५. महत्त्वाचे प्रश्न** ..... ८

५.१ नूतनशील ऊर्जेच्या वाढीस चालना देणे ..... ८

५.२ वीज मागणी व्यवस्थापन ..... ९

५.३ पारेषण नियोजन ..... १०

५.४ मंजूर केलेले परवाने ..... १२

**६. वीज दराचे आणि अन्य निवडक आदेश** ..... १३

**७. विनियम आणि कार्यप्रणाली निर्देश** ..... ३१

७.१ विनियम ..... ३१

७.२ कार्यप्रणाली निर्देश ..... ३१

**८. ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच** ..... ३४

८.१ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच ..... ३४

८.२ विद्युत लोकपाल ..... ३६

८.३ प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी ..... ३७

**९. माहितीचा अधिकार कायदा** ..... ३८

**१०. वार्षिक लेखे – एक दृष्टीक्षेप (आर्थिक वर्ष २०१६-१७)** ..... ३९

**परिशिष्ट- १** : दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षासाठी तात्पुरता आय-व्यय लेखा ..... ४१

**परिशिष्ट- २** : आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये आयोगाने पारित केलेले आदेश ..... ४४

# १. आयोगाची स्थापना व कार्ये

विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ च्या अंतर्गत महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ ऑगस्ट, १९९९ च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची स्थापना केली असून आयोगात अध्यक्ष व दोन सदस्य आहेत. आयोगाकडे (एक) अर्ध-न्यायिक, (दोन) अर्ध-वैधानिक आणि (तीन) कार्यकारी स्वरुपाची कामे सोपविण्यात आली आहेत. सदर अधिनियमांतर्गत आयोगाकडे सुरुवातीला खालील कार्ये सोपविण्यात आली होती :-

अ) राज्यांतील घाऊक, ठोक, ग्रिड किंवा किरकोळ वीज विक्रीचे दर निश्चित करणे;

ब) पारेषण सुविधेचा वापर करण्यासाठी पारेषण दर निश्चित करणे;

क) राज्यातील विजेचे पारेषण, विक्री, वितरण आणि पुरवठा करण्यासाठी निर्मिती कंपन्या, किंवा अन्य स्रोतांकडून ज्या किंमतीने वीज प्राप्त करुन घेण्यात येईल त्या किंमतीसह पारेषण कंपन्या आणि वितरण कंपन्यांच्या विजेची खरेदी आणि वीज प्राप्त करुन घ्यावयाच्या प्रक्रियेचे नियमन करणे;

ड) या अधिनियमाची उद्दिष्टे व हेतू साध्य करण्यासाठी, वीज उद्योगात स्पर्धा, कार्यक्षमता व काटकसरीस चालना देणे.

सन २००३ मध्ये, विद्युत अधिनियम, २००३ दि. १० जून, २००३ रोजी अंमलात आल्यानंतर विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ रद्द झाला व आयोगाकडे खालील अन्य अतिरिक्त कार्ये सोपविण्यात आली :-

अ) विजेचे राज्यांतर्गत पारेषण व वहन सुकर करणे;

ब) विजेचे पारेषण, वितरण आणि विजेचा व्यापार करण्यासाठी परवाना देणे;

क) नूतनशील उर्जा स्त्रोतांपासून सह-निर्मितीस आणि वीज निर्मितीस चालना देणे;

ड) परवानाधारक आणि वीज निर्मिती कंपन्या यांच्यामधील आणि परवानाधारकांमधील आप-आपसातील वादासंबंधी अभिनिर्णय देणे आणि वाद लवादाकडे संदर्भ करणे;

इ) या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता शुल्क लावणे;

फ) राज्य ग्रिड संहिता विनिर्दिष्ट करणे;

ग) परवानाधारकांच्या सेवेची गुणवत्ता, सातत्य व विश्वासार्हता यांची मानके विनिर्दिष्ट करणे किंवा अंमलात आणणे;

ह) राज्यांतर्गत विजेच्या व्यापारासाठी, आवश्यकता असल्यास, नफ्याचे प्रमाण निश्चित करणे;

ज) या अधिनियमाखाली सोपविण्यात येतील अशी अन्य कार्ये पार पाडणे;

य) विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(२) अंतर्गत राज्य शासनास सल्ला देणे.

# २. आयोगाचा संरचनात्मक तक्ता

## २.१ अध्यक्ष व सदस्य

आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये अध्यक्षांचे पद रिक्त होते. श्री. अज़ीज एम. खान आणि श्री. दीपक लाड हे सदस्य म्हणून या वर्षातही कार्यरत होते.

## २.२ आयोगाच्या आस्थापनेवरील कर्मचारी

महाराष्ट्र शासनाने विद्युत नियामक आयोग अधिनियम, १९९८ अंतर्गत आयोगावर सोपविण्यात आलेली कार्ये पार पाडण्यासाठी आयोगाच्या आस्थापनेवर सुरुवातीला जून, २००० मध्ये २४ पदे मंजूर केली होती. त्यानंतर, मार्च, २०१० मध्ये आयोगावर विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत सोपविण्यात आलेल्या व्यापक कार्यांतून निर्माण झालेली वाढीव कामे पार पाडण्यासाठी शासनाने आयोगास अतिरिक्त ३९ पदे मंजूर केली. या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

### ३१ मार्च, २०१७ रोजीची कर्मचाऱ्यांची माहिती

| अनु क्रमांक | पदाचे नाव | मंजूर पदांची संख्या | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १. | सचिव | १ | १ | ० |
| २. | कार्यकारी संचालक | १ | १ | ० |
| ३. | संचालक (विद्युत अभियांत्रिकी) | २ | १ | १ |
| ४. | संचालक (वीज दर) | २ | ० | २ |
| ५. | संचालक (विधी) | १ | ० | १ |
| ६. | संचालक (प्रशासन व वित्त) | १ | ० | १ |
| ७. | उप-संचालक (तांत्रिक) | ८ | ८ | ० |
| ८. | उप-संचालक (विधी) | ४ | २ | २ |
| ९. | उप-संचालक (प्रशासन व वित्त) | ४ | २ | २ |
| १०. | अवर सचिव | १ | १ | ० |
| ११. | कक्ष अधिकारी | २ | २ | ० |
| १२. | सहाय्यक संचालक | ४ | १ | ३ |
| १३. | संगणक प्रणाली प्रशासक | १ | ० | १ |
| १४. | डेटाबेस/वेब प्रशासक | १ | १ | ० |
| १५. | सहाय्यक लेखा अधिकारी | १ | ० | १ |
| १६. | स्वीय सहाय्यक (निवड श्रेणी) | ३ | ३ | ० |
| १७. | स्वीय सहाय्यक (उच्च श्रेणी) | २ | १ | १ |
| १८. | उच्च श्रेणी लघुटंकलेखक (इंग्रजी) | १ | ० | १ |
| १९. | उच्च श्रेणी लघुटंकलेखक (मराठी) | १ | ० | १ |
| २०. | स्वागतकार-नि-दूरध्वनी चालक-नि-कार्यालय सहाय्यक | १ | १ | ० |
| २१. | लिपिक-टंकलेखक-नि-कार्यालय सहाय्यक | ७ | ३ | ४ |
| २२. | ग्रंथपाल-नि-कार्यालयीन सहाय्यक | १ | १ | ० |
| २३. | वाहन चालक-नि-सामान्य सहाय्यक | ५ | ४ | १ |
| २४. | शिपाई | ८ | ७ | १ |
| | एकूण | ६३ | ४० | २३ |

## २.३ सल्लागार

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ९१(४) अंतर्गत, आयोग आपली कर्तव्ये पार पाडण्याकरिता त्यास मदत करण्यासाठी कुशल सल्लागारांची नियुक्ती, विहित करण्यात येतील त्या अटी व शर्तींवर, करु शकतो. आयोगाने मविनिआ (सल्लागारांच्या नेमणुकीच्या अटी व शर्ती) विनियम, २००४ अधिसूचित केले आहेत. आयोग, आवश्यक असेल तेव्हा, विविध तांत्रिक, वित्तीय, कायदेविषयक व प्रशासकीय स्वरुपाची कार्ये पार पाडताना त्यास मदत करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करतो.

## ३. राज्य सल्लागार समिती

आयोगाकडून विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८७ अंतर्गत राज्य सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्य सल्लागार समिती स्थापण्यामागचे उद्देश (एक) महत्त्वाच्या धोरणात्मक प्रश्नांबाबत; (दोन) परवानाधारकांनी पुरविलेल्या सेवेचा दर्जा, सातत्य आणि व्याप्तीशी संबंधित बाबींबाबत; (तीन) परवानाधारकांनी त्यांच्या परवान्याच्या अटी व आवश्यकतांचे पालन करण्याबाबत; (चार) ग्राहक हिताचे रक्षण करण्याबाबत आणि (पाच) विद्युत कंपन्यांचा ऊर्जा पुरवठा आणि त्यांच्या एकूण कामगिरीच्या दर्जाबाबत, आयोगास सल्ला देणे, हे आहेत. राज्य सल्लागार समिती (एस ए सी) दर दोन वर्षांनी पुनर्गठीत करण्यात येते. आयोगाचे अध्यक्ष हे राज्य सल्लागार समितीचे अध्यक्ष असतात व आयोगाचे सदस्य हे या समितीचे पदसिध्द सदस्य असतात. आयोगाचे सचिव हे राज्य सल्लागार समितीचे सदस्य-सचिव आहेत.

आयोगाने, समितीच्या सदस्यांचा कार्यकाल २२ ऑगस्ट, २०१६ रोजी संपल्यानंतर, राज्य सल्लागार समितीचे पुनर्गठन दोन वर्षांच्या कालावधीसाठी खालील सदस्यांसह केले:-

| | | |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष, मविनिआ | पदसिध्द अध्यक्ष |
| २. | सदस्य, मविनिआ (एक) | पदसिध्द सदस्य |
| ३. | सदस्य, मविनिआ (दोन) | पदसिध्द सदस्य |
| ४. | सचिव, मविनिआ | सदस्य-सचिव |
| ५. | सचिव, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन | पदसिध्द सदस्य |
| ६. | सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन | पदसिध्द सदस्य |
| ७. | सह सचिव, नूतन व नूतनशील ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली | सदस्य |
| ८. | महा व्यवस्थापक/मुख्य अभियंता (विद्युत), मध्य रेल्वे, मुंबई | सदस्य |
| ९. | परिमंडल व्यवस्थापक (पश्चिम परिमंडल), ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ मर्यादित, मुंबई | सदस्य |
| १०. | महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रिकल्चर, मुंबई | सदस्य |
| ११. | फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री, (एफआयसीसीआय) महाराष्ट्र स्टेट कॉन्सिल, मुंबई | सदस्य |
| १२. | कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सीआयआय), महाराष्ट्र स्टेट कॉन्सिल, मुंबई | सदस्य |
| १३. | प्रयास, (ऊर्जा ग्रुप), पुणे | सदस्य |
| १४. | अध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत, मुंबई | सदस्य |
| १५. | अध्यक्ष, ठाणे-बेलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन, नवी मुंबई, | सदस्य |
| १६. | महाराष्ट्र वीज ग्राहक संघटना, इचलकरंजी, जिल्हा - कोल्हापूर | सदस्य |
| १७. | टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई | सदस्य |
| १८. | इंदिरा गांधी इन्स्टिट्युट ऑफ डेव्हलेपमेंट रिसर्च, मुंबई | सदस्य |
| १९. | मुख्य कार्यकारी अधिकारी, इंडियन एनर्जी एक्सचेंज लि.,मुंबई | सदस्य |
| २०. | संचालक (विद्युत अभियांत्रिकी विभाग), इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई | सदस्य |
| २१. | अध्यक्ष, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन, नागपूर | सदस्य |

# ४. महाराष्ट्रातील विद्युत क्षेत्रातील परिस्थिती

## ४.१ वीज निर्मिती

राज्याची विजेची गरज, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित, खाजगी वीज निर्मिती कंपन्या, केंद्रीय क्षेत्रातून मिळणारा वाटा आणि नूतनशील ऊर्जा निर्माते यांच्याकडून, भागविण्यात येते. महाराष्ट्राची ऊर्जेची गरज आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता १४७८७८ दशलक्ष युनिट्स इतकी होती व त्यापैकी ३४ टक्के महानिर्मिती कंपनीकडून, २५ टक्के केंद्रीय क्षेत्राच्या वाट्यातून, २३ टक्के स्वतंत्र वीज निर्माते, ४ टक्के नूतनशील ऊर्जा निर्माते, ८ टक्के मुंबईतील निर्मात्यांकडून (टाटा पॉवर कंपनी लि.-निर्मिती (टीपीसी-निर्मिती) आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.-निर्मिती (आरइन्फ्रा-निर्मिती), ६ टक्के अल्प-कालिन आणि आंतर-राज्य द्वि-पक्षीय खरेदीतून, भागविण्यात आली.

राज्याच्या एकूण स्थापित क्षमतेमध्ये, महानिर्मिती कंपनीचा १३८८२ मेगावॅट्सचा प्रमुख वाटा होता. यामध्ये औष्णिक निर्मिती क्षमता १०५८० मेगावॅट्स, जल-विद्युत निर्मिती क्षमता २४५० मेगावॅट्स, वायुवर आधारित निर्मिती क्षमता ६७२ मेगावॅट्स आणि १८० मेगावॅट्स सौर निर्मिती क्षमतेचा समावेश होता. महानिर्मिती कंपनीची निर्मिती केंद्रे राज्यभर पसरली असून त्यामध्ये चंद्रपूर, कोराडी, पारस, परळी, भुसावळ, खापरखेडा, आणि नाशिक या औष्णिक केंद्रांचा, उरण येथील वायुवर आधारित प्रकल्पाचा आणि कोयना, वैतरणा, भिरा, घाटघर (पंप स्टोअरेज) या जल-विद्युत प्रकल्पांचा समावेश आहे. महानिर्मिती कंपनीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण), या राज्य शासनाच्या वितरण कंपनीशी, दीर्घ -कालिन वीज खरेदी करार केला आहे.

महानिर्मिती कंपनीशिवाय, काही स्वतंत्र वीज निर्मात्यांनी (आयपीपी) राज्यातील वितरण परवानाधारकांबरोबर विजेच्या पुरवठ्यासाठी करार केलेले आहेत. राज्यातील प्रमुख स्वतंत्र वीज निर्माते खालीलप्रमाणे आहेत:-

### महाराष्ट्रातील प्रमुख स्वतंत्र वीज निर्माते

| अ.क्र. | स्वतंत्र वीज निर्माते (आयपीपी) | स्थापित क्षमता (मेगावॅट) |
|---|---|---|
| **वितरण परवानाधारकाबरोबर वीज खरेदी करार केलेले** | | |
| १ | अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड, तिरोडा | ३३०० |
| २ | जेसड्ब्ल्यु एनर्जी लि., रत्नागिरी | १२००* |
| ३ | रत्तन इंडिया पॉवर लि., अमरावती | १३५० |
| ४ | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लि. बुटीबोरी | ६०० |
| **वितरण परवानाधारकाबरोबर वीज खरेदी करार न केलेले** | | |
| ५ | रत्तन इंडिया पॉवर लि., नाशिक | ५४० |
| ६ | वर्धा पॉवर कंपनी लि., चंद्रपूर | ५४० |
| ७ | अभिजित एमएडीसी नागपूर एनर्जी प्रा. लि., नागपूर | २४६ |
| ८ | गुप्ता एनर्जी प्रा. लि. चंद्रपूर | १२० |
| ९ | आयडिअल एनर्जी प्रोजेक्ट्स लि. नागपूर | २७० |
| १० | धारिवाल इन्फ्रास्ट्रक्चर लि. | ३०० |
| ११ | पायोनियर गॅस पॉवर लि. | ३८८ |
| १२ | अन्य स्व-वपरासाठीचे वीज निर्माते/ स्वतंत्र वीज निर्माते | ६५९.४ |
| | **एकूण** | **९५१३.४** |

** वीज खरेदी करार हा एकूण क्षमतेचा भाग आहे*

### मुंबईतील स्थापित निर्मिती क्षमता

| अ.क्र. | कंपनी | स्थापित क्षमता (मेगावॅट) |
|---|---|---|
| १ | टाटा पॉवर कं. लि. - निर्मिती (औष्णिक आणि जल) | १८७७ |
| २ | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. - निर्मिती/(डहाणू औष्णिक) | ५०० |
| | **एकूण** | **२३७७** |

राष्ट्रीय औष्णिक विद्युत महामंडळाच्या (एनटीपीसी) कोर्बा, विंध्याचल, कावास, गंधार, सिपत, मौदा, इ. आणि भारताचे अणुशक्ती विद्युत महामंडळ लि. (एनपीसीआयएल) च्या तारापूर येथील प्रकल्पामधून केंद्रीय क्षेत्रातील विजेचा वाटा पुरविण्यात येतो. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये एकूण ३६७०१ दशलक्ष युनिट्स केंद्रीय क्षेत्रातील निर्मिती केंद्रांकडून पुरविण्यात आले होते.

## ४.२ विजेचे पारेषण

पारेषण हा विद्युत यंत्रणेचा एक महत्वाचा भाग आहे आणि निर्मिती केंद्रांकडून शेवटी ग्राहकांपर्यंत ठोक वीज नेण्यासाठी त्याची गरज असते. विविध पारेषण परवानाधारकांच्या पारेषण यंत्रणांना एकत्रितपणे राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा असे म्हणतात. राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन करण्याची जबाबदारी राज्य पारेषण कंपनी (एसटीयु), म्हणजेच महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीवर (महापारेषण) असते. महाराष्ट्रात खालीलप्रमाणे नऊ पारेषण परवानाधारक आहेत -

| अ.क्र. | परवानाधारक | परवाना क्र. | परवाना दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि., (महापारेषण कंपनी ) | मानीव परवानाधारक | |
| २. | टाटा पॉवर कंपनी (पारेषण) (टीपीसी-पारेषण ) | सन २०१४ चा १ | १४ ऑगस्ट- २०१४ (१६ ऑगस्ट, २०१४ पासून अंमलात) |
| ३. | रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्स्चर (पारेषण)- (आरइन्फ्रा-पारेषण) | सन २०११ चा १ | ११ ऑगस्ट, २०११ (१६ ऑगस्ट, २०११ पासून अंमलात) |
| ४. | जयगड पॉवर ट्रान्समिशन लि. (जेपीटीएल) | सन २००९ चा १ | ८ फेब्रुवारी, २००९ |
| ५. | अदानी ट्रान्समिशन (इंडिया) लि.(एटीआयएल) (पूर्वीची अदानी पॉवर महाराष्ट्र लि.-एपीएमएल) | सन २००९ चा २ | ६ जुलै, २००९ |
| ६. | महाराष्ट्र ईस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एमइजीपीटीसीएल ) | सन २०१० चा १ | २१ सप्टेंबर, २०१० |
| ७. | सिन्नर पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एसपीटीसीएल) | सन २०१० चा २ | २८ डिसेंबर, २०१० |
| ८. | अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एपीटीसीएल) | सन २०१० चा ३ | ३० डिसेंबर, २०१० |
| ९. | विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लि. (पारेषण) - (व्हीआयपीएल–पारेषण) | सन २०१५ चा १ | ५ जानेवारी, २०१५ |

विद्यमान आणि नव्याने उभारलेल्या निर्मिती प्रकल्पांमधील विजेचे निष्कासन करण्याकरिता, केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीईए) आणि पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. (पीजीसीआयएल) यांच्याबरोबर समन्वयाने हाती घेण्यात आलेल्या यंत्रणेच्या अभ्यासाच्या आधारे, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचे नियोजन, जिचा वर उल्लेखलेले पारेषण परवानाधारक एक भाग आहेत, राज्य पारेषण कंपनीकडून करण्यात येते.

महाराष्ट्रातील पारेषण वाहिन्या आणि उप-केंद्रे यांचा ( ३१ मार्च, २०१७ रोजी) तपशील खालीलप्रमाणे आहे:-

**पारेषण वाहिन्या आणि उप-केंद्रे**

| अ.क्र. | परवानाधारकाचे नाव | सर्किट-किमी वाहिनी | उप-केंद्रांची संख्या | ट्रान्सफॉर्मेशन क्षमता (एमव्हीए) |
|---|---|---|---|---|
| १ | महापारेषण कंपनी | ४५११९ | ६५४ | ११९७८७ |
| २ | टीपीसी--पारेषण | १२२१ | २१ | ८५४७ |
| ३ | आरइन्फ्रा-पारेषण | ५३९ | ८ | ३००० |
| ४ | जेपीटीएल | ३३४ | ० | ० |
| ५ | एटीआयएल | ४३८ | ० | ० |
| ६ | एपीटीसीएल | २२२ | ० | ० |
| ७ | एमइजीपीटीसीएल | १३२० | ३ | ९००० |
| ८ | एसपीटीसीएल | ११३ | २ | ० |
| ९ | व्हीआयपीएल—पारेषण | ६.१२ | २ | ० |
| | एकूण | ४९३१२.१२ | ६८६ | १४०३३४ |

## ४.३ विजेचे वितरण

महराष्ट्रातील ग्राहकांची विजेची गरज चार वितरण परवानाधारक भागवितात. हे परवानाधारक पुढीलप्रमाणे आहेत - महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण कंपनी), रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी लि. (आरइन्फ्रा-वितरण), दि टाटा पॉवर कंपनी लि. (टीपीसी-वितरण) आणि बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट). बेस्ट, आरइन्फ्रा-वितरण आणि टीपीसी-वितरण या कंपन्या बहुतांश मुंबई शहर आणि त्याच्या उपनगरांना वीज पुरवितात तर उर्वरित महाराष्ट्रात (आणि मुंबई उपनगरातील छोट्याशा क्षेत्राला) वीज पुरवठा महावितरण कंपनीद्वारे करण्यात येतो.

**वीज वितरणाचा तपशिल**

| तपशील | महावितरण २०१६-१७ | टीपीसी २०१६-१७ | आरइन्फ्रा २०१६-१७ | बेस्ट २०१६-१७ |
|---|---|---|---|---|
| ग्राहकांची संख्या (लाखांत) | २४०.८२ | ७.२१ | २३.६८ | १०.२८ |
| विक्री (दशलक्ष युनिट) | ९२,१९७ | ४,९५० | ८,२३१ | ४,६६७ |
| वीज पुरवठ्याचा सरासरी खर्च (रुपये प्रति युनिट) | ६.४५ | ६.७९ | ९.५८ | ८.८१ |
| वीज खरेदीचा सरासरी खर्च (रुपये प्रति युनिट) | ३.७९ | ४.७५ | ४.८६ | ४.९० |
| एकाच वेळी असलेली (कोइन्सिडंन्ट) सर्वोच्च मागणी (मेवॅ)* | १५,६५७ | ८८७ | १,३५९ | ८३७ |

** आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या शेवटच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा दराच्या आदेशात मंजूरी देण्यात आली आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या कालावधीचा वीज दर निश्चित करताना विचारात घेण्यात आली.*

या व्यतिरिक्त, ५ विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) विकासकांच्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी आयोगाने निर्गमित केल्या. हे विकासक विद्युत अधिनियम,२००३ च्या तरतूदींअंतर्गत, त्यांच्या अधिसूचित करण्यात आलेल्या सेझ क्षेत्रात विजेचा पुरवठा करण्यासाठी, मानीव वितरण परवानाधारक आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

१. माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रायव्हेट लि.
२. महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि.
३. क्वाड्रन बिझनेस पार्क लि.
४. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि.
५. निदार युटिलिटीज पनवेल एल.एल.पी.

या मानीव वितरण विकासकांनी त्यांचा वितरण व्यवसाय सुरु करण्याचे काम विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर आहे. केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने भारतीय रेल्वे यांना देखील विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत मानीव वितरण परवानाधारक म्हणून मान्यता दिली आहे, तथापि त्यांनी वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी विनिर्दिष्ट करण्यासाठी आयोगाकडे अद्याप अर्ज करावयाचा आहे.

## ४.४ नूतनशील ऊर्जा

महाराष्ट्राची नूतनशील ऊर्जा निर्मितीची संभाव्य क्षमता ७८०७१ मेगावॅट आहे जी राष्ट्रीय क्षमतेच्या (८९६६०१ मेगावॅट) ८.७० टक्के आहे. खालील तक्त्यात नूतनशील आणि अ-पारंपरिक स्रोतांपासून (पवन, सौर, बायोमास, ऊसाच्या चिपाडांपासून सह-निर्मिती इ. सह) ऊर्जा निर्मितीची सद्यस्थिती दाखविण्यात आली आहे :-

**नूतनशील आणि अ-पारंपरिक ऊर्जा निर्मितीची संभाव्य क्षमता**

| स्रोत | भारत | | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|
| | संभाव्य क्षमता (मेगावॅट) | संचयी साध्य (मेगावॅट) (३१.०३.२०१७ पर्यंत) | संभाव्य क्षमता (मेगावॅट) | संचयी साध्य (मेगावॅट) (३१.०३.२०१७ पर्यंत) |
| पवन ऊर्जा | १०२७७२ | ३२२७९.५ | ९४०० | ४७६९.२१ |
| सौर ऊर्जा | ७४८९९० | ११६३२.८३ | ६४३२० | ३७६ |
| बायोमास | १७५३६ | | ७८१ | २१५ |
| ऊसाच्या चिपाड्यांपासून सह-निर्मिती | ५००० | ८१८१.७० | २२०० | ८४८.८५ |
| लघु-जल विद्युत | १९७४९ | ४३७९.८५ | ७३३ | ३००.०२५ |
| कचऱ्यातून ऊर्जा | २५५४ | ११४.०८ | ६३७ | ३७.७१३ |
| **एकूण (मेगावॅट मध्ये)** | **८९६६०१** | **५६५८८.२२** | **७८०७१** | **७५४६.७९८** |

देशाच्या एकूण निर्मितीशी तुलना करता, महाराष्ट्राची नूतनशील स्रोतांपासून ऊर्जा निर्माण करण्याची संभाव्य क्षमता जरी ८.७० टक्के असली तरी प्रत्यक्ष निर्मिती ही देशातील अशा स्रोतांपासूनच्या एकूण निर्मितीच्या १३.३३ टक्के आहे. मागील १३ वर्षांमध्ये विविध स्रोतांपासून ऊर्जा निर्मिती क्षमतेमध्ये घालण्यात आलेली भर खालील तक्त्यात दाखविण्यात आली आहे:-

| अनु क्रमांक | नूतनशील ऊर्जेचा प्रकार | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ | २०१३-२०१४ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ | एकूण (३१-०३-२०१७ पर्यंत) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पवन ऊर्जा प्रकल्प | *४५६ | ५४५ | ४८५ | २६८ | १७८ | १३९ | २३९ | ४०७.०६ | २८८.६ | १०७४ | ३६२.०५ | २२०.२ | १०७.३ | ४७६९.२१ |
| २ | बायोमास विद्युत प्रकल्प | ८ | ० | १० | १६ | ६१(#) | २० | ४० | ० | १५ | २० | १० | १५ | ० | २१५ |
| ३ | ऊसाच्या चिपाडांपासून सह-निर्मिती | **८४ | १७ | ५७ | ८१ | ३० | २९ | ३२३.१ | २७२.९ | १९५ | २६५.७५ | ६० | ३६१.१ | ७३ | १८४८.८५ |
| ४ | कचऱ्यातून ऊर्जा | ० | ० | ० | ० | ० | ० | ४.७३ | ० | ४ | ३ | ० | २५.९८ | ० | ३७.७१३ |
| ५ | लघु-जल प्रकल्प | ***२०६.८३ | ० | ० | ६.५ | ० | १६ | १६.९ | १८.५ | ६ | ० | १३.३ | ८.२२ | ७.७७५ | ३००.०२५ |
| ६ | सौर ऊर्जा | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १९ | ३०.१५ | १८०.१० | ९९ | ३६.५ | १०.२५ | ३७६ |
| | **एकूण** | **७५४.८३** | **५६२** | **५५२** | **३७१.५** | **२६९** | **२०४** | **६२४.७३** | **७१७.४६** | **५३८.७५** | **१५४२.८५** | **५४४.३५** | **६६७.२८** | **१९८.३२५** | **७५४६.७९८** |

*टीप:- सन २००४-०५ मध्ये क्षमतेमध्ये प्रत्यक्ष घातलेली भर फक्त ७४.२५ मेगावॅट्स होती. (स्रोत-महाऊर्जा)*

** या क्षमतेमध्ये सन २००४-०५ पूर्वी सुरु झालेले ४०७ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.*

*** या क्षमतेमध्ये सन २००४-०५ पूर्वी सुरु झालेले ६७ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.*

**** या क्षमतेमध्ये सन २००४ पूर्वी सुरु झालेले २०० मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प समाविष्ट आहेत.*

# ५. महत्त्वाचे प्रश्न

## ५.१ नूतनशील उर्जेच्या वाढीला चालना देणे

विद्युत अधिनियम २००३ आणि वातावरणातील बदला संबंधीच्या राष्ट्रीय कृती आराखड्याच्या अनेक उद्दिष्टांपैकी नूतनशील उर्जेच्या विकासाला चालना देणे, हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ८६ (१) (इ) अंतर्गत नूतनशील उर्जेच्या विकासाला चालना देण्यासाठी राज्य विद्युत नियामक आयोगाला संबंधित वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रात नूतनशील ऊर्जा ऊर्जा स्त्रोतांपासून निर्माण झालेल्या विजेतून खरेदी करावयाच्या विजेच्या टक्केवारीचे (आरपीओ) लक्ष्यांक विनिर्दिष्ट करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार आयोगाने, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जा खरेदीचे बंधन, त्याचे पालन व नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१० ('आरपीओ विनियम') हे विनियम ७ जून, २०१० रोजी अधिसूचित केले आहेत. यामध्ये बंधन असलेल्या व्यक्ती/संस्थांकरिता आर्थिक वर्ष २०१०-११ ते २०१५-१६ या कालावधीत त्यांनी नूतनशील ऊर्जा ऊर्जा स्त्रोतांपासून निर्माण झालेल्या विजेतून खरेदी करावयाच्या विजेच्या टक्केवारीचे (आरपीओ) लक्ष्यांक विहित करण्यात आले आहेत.

त्यानंतर, आयोगाने ३० मार्च, २०१६ रोजी आरपीओ विनियम अधिसूचित करुन त्यामध्ये बंधन असलेल्या व्यक्ति/संस्थांसाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० करिता आरपीओ लक्ष्यांक निश्चित केले आहेत. या आरपीओ विनियमांतर्गत, वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० पर्यंतच्या कालावधीत बिगर सौर नूतनशील ऊर्जा खरेदीच्या ०.२ टक्के खरेदी मिनी/मायक्रो जल-विद्युत प्रकल्पांमधून करणे आवश्यक आहे.

आरपीओ लक्ष्यांक आर्थिक वर्ष २०१६-१७ ते २०१९-२० या कालावधीकरिता खालीलप्रमाणे आहेत:

**नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाचे लक्ष्यांक**

| वर्ष | नूतनशील ऊर्जा स्त्रोतांपासून (युनिट मधील सममूल्य ऊर्जा ) करावयाच्या वीज खरेदीचे परिमाण (टक्केवारीत) | | |
|---|---|---|---|
| | सौर | बिगर सौर (अन्य नूतनशील ऊर्जा) | एकूण |
| | (अ) | (ब) | (क) |
| २०१६-१७ | १.००% | १०.००% | ११.००% |
| २०१७-१८ | २.००% | १०.५०% | १२.५०% |
| २०१८-१९ | २.७५% | ११.००% | १३.७५% |
| २०१९-२० | ३.५०% | ११.५०% | १५.००% |

मागील विनियमांप्रमाणेच, नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या (आरपीओ) लक्ष्यांकाची पूर्तता नूतनशील ऊर्जा प्राप्त करुन किंवा नूतनशील ऊर्जा प्रमाणपत्रे (आरईसी) खरेदी करुन करता येईल. तथापि, हे लक्ष्यांक मागील लक्ष्यांकापेक्षा खूप अधिक आहेत.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाच्या (महाऊर्जा) नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या हिशोबपूर्ती अहवालाच्या आधारे, आयोगाने, वितरण परवानाधारकांनी आर्थिक वर्ष २०१४-१५च्या नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाच्या लक्ष्यांकांच्या केलेल्या पूर्ततेच्या पडताळणीवर, आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये स्वतःहून आदेश देखील निर्गमित केले आहेत.

आयोग वार्षिक आदेशांद्वारे वेगवेगळ्या नूतनशील स्त्रोतांतून वितरण परवानाधारकाने खरेदी करावयाच्या विजेचे व्यापक (जेनेरिक) वीज दर निश्चित करते. आयोगाने १० नोव्हेंबर २०१५ रोजी नवीन नूतनशील उर्जेच्या वीज दरांचे विनियम, २०१५ (आर्थिक वर्ष २०१९-२० पर्यंत अंमलात) अधिसूचित केले. आयोगाने सन २०१६ च्या प्रकरण क्र. ४५ मधील दिनांक २९ एप्रिल २०१६ च्या आदेशाने आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता नूतनशील उर्जेचा व्यापक(जेनेरिक) वीज दर निश्चित केला.

## ५.२ वीज मागणी व्यवस्थापन

मविनिआ (वीज मागणी व्यवस्थापन कार्यान्वित करावयाची चौकट) विनियम, २०१० आणि मविनिआ (वीज मागणी व्यवस्थापनाच्या परिमापन आणि कार्यक्रमाच्या खर्चाच्या परिणामकारकतेचे निर्धारण) विनियम, २०१०, हे वीज मागणी व्यवस्थापनासंबंधीचे विनियम तयार करणारा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग हा देशातील पहिला विद्युत नियामक आयोग आहे.

या विनियमांचा उद्देश हा विद्युत परवानाधारकांमार्फत कार्यक्षम ऊर्जा व ऊर्जा संवर्धनासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना चालना देणे, हा आहे. या विनियमांमुळे परवानाधारकांवर वीज मागणी व्यवस्थापन हे त्यांच्या दैनंदिन कामकाजाचा एक भाग करणे आवश्यक झाले आहे. परवानाधारक वीज मागणी व्यवस्थापनावर होणारा त्यांचा खर्च हा शेवटी ग्राहकांकडून वीज दराच्या माध्यमातून वसूल करावयाचा खर्च म्हणून तो एकूण महसुली गरजेत समाविष्ट करु शकतात.

वीज मागणी व्यवस्थापनाचे पध्दतशीरपणे नियोजन करण्यासाठी आणि हे कार्यक्रम कमी खर्चिक असावेत यासाठी, आयोगाला मदत करण्याकरिता या विनियमांखाली वीज मागणी व्यवस्थापन सल्लागार समिती स्थापन करण्यात आली आहे.

मविनिआ (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ मधील विनियम ६.४ अंतर्गत वितरण परवानाधारकांनी कार्यक्षम ऊर्जा आणि वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत ठरवून देण्यात आलेले लक्ष्यांक विचारात घेऊन किती वीज खरेदी करण्याची गरज असेल, त्याचा अंदाज काढणे आवश्यक आहे.

### *आर्थिक वर्ष २०१६-१७ मधील वीज मागणी व्यवस्थापन कार्यक्रमाखालील प्रगती*

आयोगाने वीज मागणी व्यवस्थापनांतर्गत प्रोत्साहनांवर आधारित विविध कार्यक्रम मंजूर केले आहेत. या कार्यक्रमांतर्गत झालेली प्रगती व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहेः

### *पंचतारांकित सिलिंग पंख्यांचा कार्यक्रम*

आरइन्फ्रा-वितरण, टीपीसी-वितरणने पंचतारांकित सिलिंग पंख्यांचा कार्यक्रम राबविला. आरइन्फ्राने २०००० सिलिंग पंखे बदलण्याचा लक्ष्यांक साध्य केला आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये १.५७ दशलक्ष युनिट्सची बचत करुनही योजना यशस्वीपणे राबवून बंद केली. टीपीसी- वितरणने २१८५ पंखे बदलले व १.५५८ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

### *पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रांचा कार्यक्रम*

आरइन्फ्रा वितरण आणि टीपीसी-वितरणने पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रांचा कार्यक्रम राबविला होता. आरइन्फ्राने या कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी सुरु केली असून त्यांचा जुनी १५०० वातानुकुलित यंत्रे पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रांनी बदलण्याचा लक्ष्यांक असून त्यांनी वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांसाठी ५१३ स्प्लिट वातानुकुलित यंत्रे बसविली आणि ०.२० दशलक्ष युनिट्सची बचत केली. टीपीसी-वितरणने ३३२ विन्डो वातानुकुलित यंत्रे बदलून त्याऐवजी पंचतारांकित स्प्लिट वातानुकुलित यंत्रे बसविली आणि ०.९५ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

### *पंचतारांकित रेफ्रिजरेटरचा कार्यक्रम -*

पंचतारांकित रेफ्रिजरेटरचा कार्यक्रम आरइन्फ्रा-वितरण आणि टीपीसी-वितरणकरिता मंजूर करण्यात आला होता. आरइन्फ्राने ६५०० जुने अकार्यक्षम रेफ्रिजरेटर्स बदलण्याचे लक्ष्यांक साध्य केले आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये २.६ दशलक्ष युनिट्सची बचत करुन ही योजना यशस्वीपणे बंद केली. टीपीसी-वितरणने १०६५ रेफ्रिजरेटर्स बसविले आणि १.१६३ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

### *ऊर्जा लेखापरीक्षण कार्यक्रम*

आरइन्फ्रा-वितरणने जास्त वीज वापरणाऱ्या ग्राहकांकरिता ऊर्जा लेखापरीक्षण कार्यक्रम सुरु केला. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या ग्राहकांना, जर त्यांना सूचित करण्यात येणाऱ्या उपाययोजना त्यांनी स्वीकारल्या तर प्रोत्साहन म्हणून त्यांना, लेखापरीक्षण शुल्काच्या ७५ टक्के रकमेची प्रतिपूर्ती करण्यात येते. त्यांनी ४९ ग्राहकांचे ऊर्जा लेखापरीक्षण पार पाडले असून

त्यामुळे सुमारे १४.९२ दशलक्ष युनिट्सची बचत होईल. टीपीसी-वितरणकडून ८ ऊर्जा लेखापरीक्षणे पूर्ण करण्यात आली असून त्यांच्याकडून अंदाजे ४.७३ दशलक्ष युनिट्सची बचत होईल.

*घरगुती ऊर्जा कार्यक्षम प्रकाश कार्यक्रम (डीईएलपी)*

टीपीसी-वितरण, आरइन्फ्रा-वितरण, बेस्ट आणि महावितरण कंपनी यांच्याकडून घरगुती ऊर्जा कार्यक्षम प्रकाश हा कार्यक्रम राबविण्यात येतो. टीपीसी-वितरणने १,११,६२२ एलईडी बल्बचे मार्च, २०१६ पर्यंत वाटप केले असून त्याद्वारे ५.५५३ दशलक्ष युनिट्सची बचत झाली. बेस्टने ही योजना ऑगस्ट, २०१५ मध्ये सुरु केली असून १,१२,२१३ एलईडी बल्बचे वाटप केले व त्याद्वारे ७.९५ दशलक्ष युनिट्सची बचत झाली. आरइन्फ्रा-वितरणने २,८०,००० एलईडी बल्बचे वाटप करुन १.८३ दशलक्ष युनिट्ची बचत केली. महावितरण कंपनीने ३१ मार्च, २०१७ पर्यंत २.१५ कोटी एलईडीचे वाटप करुन ६१५ दशलक्ष युनिट्सची बचत केली.

## ५.३ पारेषण नियोजन

भारतातील पारेषण यंत्रणेत आंतर-राज्य पारेषण यंत्रणा आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणांचा समावेश असतो. आंतर-राज्य आणि आंतर-प्रादेशिक पारेषण यंत्रणा या मुख्यत्वेकरुन पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (पीजीसीआयएल) च्या मालकीच्या आहेत. आंतर-राज्य पारेषण यंत्रणा, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा आणि समर्पित पारेषण वाहिन्या यांची आंतरजोडणी झालेली असते आणि या सर्व एकत्र मिळून पारेषण ग्रिड तयार होते.

केंद्रीय विद्युत प्राधिकरण हे भावी वीज निर्मिती आणि पारेषण आराखडे तयार करण्यासाठी आणि नियोजन एजन्सींच्या कामकाजात सुसुत्रता आणण्यासाठी जबाबदार आहे. केंद्रीय पारेषण कंपनी (सीटीयु) ही एक कार्यक्षम आणि समन्वित आंतर-राज्य पारेषण यंत्रणा विकसित करण्यासाठी जबाबदार असते तर, राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) हेच काम राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेसाठी करण्यास जबाबदार असते.

राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) ही, केंद्रीय पारेषण कंपनी (सीटीयु) आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सीइए), प्रादेशिक विद्युत समिती (आरपीसी), विद्युत प्रकल्प विकासक यांच्याशी विचारविनिमय करुन, पारेषण नियोजनाच्या निकषांच्या नियमावलीनुसार, आवश्यक यंत्रणा अभ्यास पार पाडून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या जाळ्याच्या मजबुतीकरणासाठी, राज्यांतर्गत निर्मिती प्रकल्पांमधील विजेच्या निष्कासनासाठी आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या ठिकाणांतून वीज खेचण्यासाठी, प्रस्ताव तयार करते. या अभ्यासात ग्रिडची मानके, ग्रिडला जोडणीची तांत्रिक मानके आणि अन्य संबंधित मानके/विनियम विचारात घेण्यात येतात. प्रमुख राज्यांतर्गत योजनांच्या नियोजनाबाबत स्थायी समितीमध्ये चर्चा करण्यात येते.

अति गर्दीच्या नागरी/निम-नागरी क्षेत्रात, अवघड भूप्रदेश इ. बाबतीत, वहिवाटीचे हक्क व खर्च इष्टतम स्तरावर ठेवून, पारेषण मार्गिकांसाठी जागेचे नियोजन करण्यात येते. हे करण्यासाठी, अंतिम यंत्रणेसाठी उच्च व्होल्टेजची पातळी स्वीकारुन आणि सुरुवातीच्या टप्प्यावर एक पातळी कमी स्तरावर काम करुन, किंवा भविष्यात अतिरिक्त सर्किटमध्ये वाहिनी टाकणे शक्य होण्यासाठी बहु-सर्किट मनोऱ्यांचा किंवा एचव्हीडीसी, जीआयएस इ. सारख्या तंत्रज्ञानांचा वापर करण्यात येतो.

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ३९ नुसार, राज्य पारेषण कंपनी ही, राज्य पारेषण कंपनीच्या ग्रिडला जोडलेले/जोडावयाचे असलेले राज्यांतर्गत वीज निर्माते आणि वितरण परवानाधारक यांच्याशी समन्वय साधून, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या नियोजनासाठी, एक नोडल एजन्सी म्हणून कार्य करते. राज्य पारेषण कंपनी ही राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा नियोजनासाठी एकल बिंदू संपर्क असते आणि ती, राज्यांतर्गत सर्व विद्युत कंपन्यांच्या वतीने, राज्यातील निर्मिती केंद्रांमधील विजेचे निष्कासन करण्यासाठी, वितरण परवानाधारकांच्या आवश्यकता भागविण्यासाठी आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेमधून वीज खेचण्यासाठी, जबाबदार असते. राज्य पारेषण कंपनी, नागरी नियोजन आणि अन्य एजन्सीज् बरोबर, त्यांच्या दीर्घ-कालिन गरजा भागविण्यासाठी पुरेशा पारेषण मार्गिकेकरिता आणि नवीन उप-केंद्रांकरिता जागेची तरतूद करण्यासाठी, समन्वय साधते.

या यंत्रणेचे नियोजन, सदर यंत्रणा नेहमीच्या परिस्थितीत तसेच संभाव्य आकस्मिक घटना घडल्यानंतर अनुज्ञेय मर्यादांमध्ये काम करु शकेल, अशारितीने करण्यात येते. तथापि या यंत्रणेत क्वचित प्रसंगी टोकाच्या आकस्मिक घटनांना सामोरे जावे लागण्याची शक्यता असते आणि अशा घटनांवर मात करण्याचे नियोजन या यंत्रणांमध्ये केलेले नसू शकते. ग्रिडची सुरक्षितता राखण्यासाठी अशा टोकाच्या/क्वचित घडणाऱ्या परंतु संभाव्य आकस्मिक घटना निश्चित करण्याची गरज आहे आणि त्यांचा विपरित परिणाम शिथिल करण्यासाठी सुयोग्य पध्दत, जसे की, भार-नियमन, निर्मितीच्या शेड्युलिंगचे फेर-निर्धारण, आयलॅन्डिंग, यंत्रणा संरक्षक योजना इ. तयार करणे आवश्यक आहे.

नियोजित पारेषण क्षमतेला मर्यादा आहेत. पूर्व-नियोजन न केलेल्या दिशेने जर मोठ्या प्रमाणावर विजेचे पारेषण करावयाचे असेल तर नक्कीच अतिभार निर्माण होऊ शकतो.

नवीन उप-केंद्रांकरिता आणि निर्मिती केंद्रांकरिता, उचित संपर्क यंत्रणांचे नियोजन केंद्रीय पारेषण कंपनी (सीटीयु)/ राज्य पारेषण कंपनी (एसटीयु) यांच्याकडून करण्यात येते आणि त्याची अंमलबजावणी त्यांच्याकडून आणि वीज निर्मात्यांकडून करण्यात येते. ज्यामुळे अशा यंत्रणा, असे केंद्र सुरु करण्याच्या वेळेस तयार झालेल्या असू शकतील.

यंत्रणेचे नियोजन, खालीलपैकी एक किंवा अनेक विद्युत यंत्रणा अभ्यासांच्या आधारे, करण्यात येते. जसे की- १) वीज प्रवाहाचा अभ्यास, २) शॉर्ट सर्किटचा अभ्यास, ३) स्थिरतेचा अभ्यास, ४) इलेक्ट्रोमॅग्नेटिक ट्रॅन्झिएन्ट प्रोग्राम (इएमटीपी) अभ्यास (स्विचिंग/ डायनॅमिक ओव्हर-व्होल्टेजीज, इन्सुलेशन को-ऑर्डिनेशन इ.करिता ).

मागितलेल्या दीर्घ-कालिन मुक्त प्रवेशाच्या गरजा विचारात घेऊन, विद्युत केंद्रापासून सुरु होऊन सर्वात जवळच्या ग्रिड बिंदूपर्यंत जाणाऱ्या नवीन पारेषण वाहिन्यांचे, निर्मात्यांशी विचार-विनिमय करुन व निर्मिती केंद्रांची जादा भार सामावून घेण्याची क्षमता विचारात घेऊन, नियोजन करण्यात येते. यंत्रणेच्या बळकटीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या नवीन पारेषण वाहिन्या टाकण्याचे नियोजन, वाहिन्या आणि ट्रान्सफॉर्मर्सच्या औष्णिक लोडिंग मर्यादेत १० टक्क्यांचे मार्जिन ठेवून, करण्यात येते.

महापारेषण कंपनीने आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये खालील प्रमुख योजना कार्यान्वित केल्या आहेत:

**महापारेषण कंपनीने कार्यान्वित केलेल्या योजना**

| अनु. क्र. | योजना |
|---|---|
| १ | ७६५/४०० केव्ही औरंगाबाद-२ उप-केंद्र<br>७६५/४०० केव्ही ३ x ५०० (विस्तार), जिल्हा- औरंगाबाद |
| २ | ४०० केव्ही हिंजेवाडी-३ जीआयएस<br>४००/२२०/३३ केव्ही, ३ x १६७ एमव्हीए,आयसीटीज २, जिल्हा- पुणे |
| ३ | ४०० केव्ही नांदेड (कुंभारगाव) (विस्तार), बिलोली, जिल्हा- नांदेड |
| ४ | ४०० केव्ही अलकुड उप-केंद्र<br>४००/२२० केव्ही, ५०० एमव्हीए आयसीटी, कवठे महाकाळ, जिल्हा- सांगली |
| ५ | ४०० केव्ही बाभळेश्वर, ५०० एमव्हीए, ४००/२२० केव्ही, आयसीटी -४ (विस्तार),<br>बाभळेश्वर, जिल्हा - नाशिक |
| ६ | ४०० केव्ही कोराडी - २ उप केंद्र<br>४००/२२० केव्ही आयसीटी-१, ५००एमव्हीए(विस्तार),कोराडी, जिल्हा- नागपूर |
| ७ | २२० केव्ही विराज प्रोफाईल उप-केंद्र,<br>२२०/३३ केव्ही, २ x ५० एमव्हीए आयसीटी, बोईसर, जिल्हा -पालघर |
| ८ | २२० केव्ही विले भागड उप-केंद्र, २२०/२२ केव्ही, १ x २५ एमव्हीए टी/एफ, विले भागड, जिल्हा-रायगड |
| ९ | २२० केव्ही लोणी देवकर उप-केंद्र, २२०/१३२ केव्ही, २ x १०० एमव्हीए आयसीटी १ आणि २<br>२२०/३३ केव्ही, ५० एमव्हीए टीएफ-१, इंदापूर, जिल्हा - पुणे |
| १० | २२० केव्ही बल्लारशाह उप-केंद्र, २२०/३३केव्ही, २ x २५ एमव्हीए, बल्लारशाह, जिल्हा - चंद्रपूर |

## ५.४ मंजूर केलेले परवाने

आयोगाला विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १५ अंतर्गत विजेचे पारेषण, वितरण आणि व्यापार करण्यासाठी परवाना मंजूर करण्याचे अधिकार आहेत. परवानाधारक त्यांच्या परवान्यात सुधारणा करण्यासाठी आयोगाकडे कलम १८ अंतर्गत अर्ज करु शकतात. आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये कोणताही नवीन परवाना मंजूर केला नव्हता.

महाराष्ट्र ईस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. (एमइजीपीटीसीएल) ने केलेला अर्ज विचारात घेऊन, तिरोडा आणि अकोला-२ येथील प्रत्येक उप-केंद्रात एका अतिरिक्त आंतर-जोडणी रोहित्राचा (ट्रान्सफॉर्मर) (७६५/४०० केव्ही, १५०० एमव्हीए) समावेश करण्यासाठी, त्यांच्या पारेषण परवान्यात सुधारणा करण्यात आली.

गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि. (ते एक सेझ विकासक असल्यामुळे, मानीव वितरण परवानाधारक) ने ठाणे जिल्ह्यातील ऐरोली नॉलेज पार्क येथील त्यांच्या माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठीच्या (सेझ) वितरण परवान्याच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका दाखल केली होती. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि.च्या सेझ क्षेत्रामध्ये ११.७४ हेक्टर्स वरुन १२.९१ हेक्टर्सचा बदल करण्यासाठी आयोगाने त्यांच्या परवाना विनियमांच्या विशिष्ट अटींमध्ये दिनांक ६ डिसेंबर, २०१६ रोजी सुधारणा केली.

तसेच, मे. सिरीन प्रॉपर्टीज प्रा. लि. (आणखी एक मानीव वितरण परवानाधारक) ने दाखल केलेल्या याचिकेवर, आयोगाने, सिरीन प्रॉपर्टीज प्रा. लि. च्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटींमध्ये, त्यांच्या नवीन नावाचा, म्हणजेच माईंडस्पेस बिझनेस पार्क्स लि.चा, समावेश करण्यासाठी त्यांच्या परवान्यात सुधारणा केली.

# ६. वीज दराचे आणि अन्य निवडक आदेश

**आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्राप्त झालेली आणि निकालात काढलेली प्रकरणे**

आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये आयोगास प्राप्त झालेल्या आणि निकालात काढलेल्या प्रकरणांची स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| १. | सुरुवातीची शिल्लक प्रकरणे | १५६ |
| २. | वर्षादरम्यान प्राप्त झालेली/ आयोगाने स्वतःहून घेतलेली प्रकरणे | १६८ |
| ३. | (मागे घेतलेली प्रकरणे, कार्यप्रणाली निर्देश, शुध्दीपत्रकाचे आदेश वगळून, वर्षादरम्यान) निकालात काढण्यात आलेली प्रकरणे | १५२ |
| ४. | वर्षाअखेरीस शिल्लक प्रकरणे | १७१ |

आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशांची यादी परिशिष्ट-२ मध्ये देण्यात आली आहे. या यादीवरुन आयोगाने हाताळलेले विविध प्रश्न दिसून येतील. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये पारित झालेल्या १५२ आदेशांचे विषय-निहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| वीज दराशी संबंधित (नूतनशील ऊर्जा वगळून) | ३१ |
| नूतनशील उर्जेशी संबंधित (मुक्त प्रवेश वगळून) | २१ |
| मुक्त प्रवेशांशी संबंधित प्रश्न | १७ |
| विद्युत लोकपाल/ ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या आदेशांची अ-पूर्तता | ३० |
| परवाना मंजुरीशी संबंधित | ०९ |
| वीज खरेदीशी संबंधित | ०९ |
| पारेषण कामांसाठी जमीन मालकांना नुकसानभरपाई देण्याबाबत | १९ |
| अन्य | १६ |

याशिवाय, आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये १४७ दैनिक आदेश निर्गमित केले. दैनिक आदेशांमध्ये प्रत्येक प्रकरणाच्या सुनावणीचा सारांश आणि प्रकरणातील अंतिम आदेश काढण्यापूर्वी आयोगाकडून देण्यात आलेल्या निर्देशांचा समावेश असतो.

आयोगाचे सर्व आदेश (दैनिक आदेशांसह) आयोगाच्या संकेत-स्थळावर जनतेसाठी उपलब्ध आहेत.

## वीज दराचे निश्चितीकरण

आर्थिक वर्ष २०१६-१७ हे आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० पर्यंतच्या तिसऱ्या बहु-वर्षीय वीज दराच्या ४ वर्षांच्या नियंत्रण कालावधीचे पहिले वर्ष होते. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये, आयोगाने निर्मिती कंपन्या, पारेषण कंपन्या आणि वितरण कंपन्यांनी आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी अंतिम अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी तात्पुरते अचूक समायोजन आणि तिसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता एकूण महसुली गरज (एआरआर) आणि वीज दर निश्चित करण्यासाठी दाखल केलेल्या बहु-वर्षीय वीज दर याचिकांवर अनेक आदेश निर्गमित केले.

## वीज निर्मिती

**महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. ची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. ४६)**

महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी लि. (महानिर्मिती कंपनी) च्या (महावितरण कंपनी बरोबर दीर्घ-कालीन वीज खरेदी करार) ११२३७ मेगावॅट निर्मिती क्षमतेच्या बहु-वर्षीय वीज दर याचिकेसंबंधी तांत्रिक वैधता बैठक झाल्यानंतर जाहीर सुनावणी दि. २६ एप्रिल २०१६ रोजी घेण्यात आली. आयोगाने दि. ३० ऑगस्ट २०१६ रोजी खालील मुद्यांसह बहु-वर्षीय वीज दराचा आदेश निर्गमित केला.

(एक) आयोगाने आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या अचूक समायोजनामध्ये रु. ६१.७७ कोटी (आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी रु.४८.६१ कोटी, आर्थिक वर्ष २०१३-१४ साठी रु. १३.१६ कोटी) महसुली शिल्लक निश्चित केली.

(दोन) ज्या निर्मिती केन्द्रांमध्ये आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी प्रत्यक्ष /अंदाजित उपलब्धता प्रमाणकानुसार उपलब्धतेपेक्षा कमी होती, तेथे बहु-वर्षीय वीज दरांच्या विनियमांनुसार वार्षिक स्थिर आकारांमध्ये यथा-प्रमाण कपात करण्यात आली. आयोगाने प्रत्यक्ष उपलब्धतेवर आधारित वार्षिक स्थिर आकारांची पूर्ण वसूली करण्यास अनुमती दिली नाही आणि पाण्याच्या अशा प्रकारच्या दुर्भिक्ष्याचा प्रतिकूल परिणाम कमी करण्यासाठी महानिर्मिती कंपनीने यापूर्वीच काळजीपूर्वक योग्य ते उपाय योजणे अपेक्षित असल्यामुळे, आयोगाने परळी औष्णिक विद्युत केंद्रासाठी २०१४-१५ च्या आर्थिक वर्षाकरिता कामगिरीचे मापदंड शिथिल केले नाहीत.

(तीन) आयोगाने तिस-या नियंत्रण कालावधीसाठी महानिर्मिती कंपनीच्या निर्मिती संचांकरिता वार्षिक स्थिर आकार आणि उर्जा आकार मंजूर केले. आयोगाने, संचालनाच्या कार्यक्षमतेत झालेली सुधारणा विचारात घेऊन, आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीच्या प्रत्यक्ष सरासरी उपलब्धतेत ५ टक्के वाढीच्या अपेक्षेने, उपलब्धतेचा अंदाज करण्यात आला आहे.

(चार) आयोगाने महानिर्मिती कंपनीच्या प्रस्तावानुसार आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि २०१७-१८ करिता विनियमांप्रमाणे १५.५ टक्क्यां ऐवजी ७.५ टक्के या कमी दराने भागभांडवलावरील परतावा मंजूर केला.

**विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लि.-निर्मितीची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (सन २०१५ चे प्रकरण क्र. ९१)**

विदर्भ इंडस्ट्रीज पॉवर लि. (व्हीआयपीएल-निर्मिती) ने त्यांच्या नागपूर जिल्ह्यामधील बुटीबोरी येथील एमआयडीसीमधील ६०० मेगावॅट निर्मिती केंद्रासाठी आरइन्फ्रा-वितरण बरोबर दीर्घ-कालीन वीज खरेदी करार केला आहे. तांत्रिक वैधता बैठक झाल्यानंतर जनतेचे अभिप्राय मागविण्यात आले आणि दि. १२ एप्रिल २०१६ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली. आयोगाने दि. २० जून २०१६ रोजी खालील ठळक मुद्यांसह बहु-वर्षीय वीज दराचा आदेश निर्गमित केला.

(एक) व्हीआयपीएल- निर्मितीने सादर केलेले रु. ३.६२ प्रती युनिटचे प्रत्यक्ष उर्जा आकार हे त्यांनी अगोदरच्या याचिकेत वीज खरेदी करार व वीज दरांच्या मंजुरीसाठी सादर केलेल्या (म्हणजेच रु. १.२३ प्रति युनिट ते रु. १.९१ प्रति युनिट दरम्यान) पेक्षा खूपच जास्त होते. याशिवाय, इंधन पुरवठा कराराच्या अंतर्गत सुरक्षित कोळशाचा लिंकेजच्या आधारे, आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६२ च्या अंतर्गत वीज खरेदी करारास मंजूरी दिली परंतु तो झाला नाही. सन २०१३ च्या प्रकरण क्रमांक २ मध्ये वीज खरेदी करारास मंजूरी मागताना अन्य कंपन्यांना स्पर्धात्मक बोलींद्वारे जे वीज दर मिळाले त्यांच्या तुलनेत आरइन्फ्रा-वितरणला व्हीआयपीएल-निर्मितीकडून रु. ३.६२ प्रति युनिट उर्जा दराने वीज खरेदी करणे किफायतशीर नव्हते. त्यांनी मागितलेले प्रत्यक्ष रु. ३.६२ प्रति युनिट ऊर्जा आकार हे त्यांनी वीज खरेदी कराराला मंजुरी देण्याचे कामकाज चालू असताना निराशादायक वातावरणात (आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी) सादर केलेल्या अंदाजित प्रति युनिट रु. १.७४ च्या दराच्या दुप्पट होते. त्यामुळे, आयोगाने व्हीआयपीएल-निर्मितीला आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये झालेला प्रत्यक्ष इंधन खर्च मंजूर केला नाही
.

(दोन) आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी इंधन खर्चाचे अचूक समायोजन करताना आयोगाने कोळशाचे तेच मिश्रण म्हणजेच युनिट क्रमांक २ साठी वेस्टर्न कोल फिल्ड्स लिमिटेडकडून १०० टक्के खर्च अधिक कोळसा आणि केंद्र क्र. १ साठी साऊथ ईस्टर्न कोल फिल्ड्स लि. कडून १०० टक्के लिंकेज कोळसा विचारात घेऊन, त्याच्या आधारे आर्थिक वर्ष २०१४-१५ चा वीज दर मंजूर केला.

(तीन) आयोगाने आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी ८४.८३ टक्के उपलब्धता मंजूर केली. प्रत्यक्ष उपलब्धता ही लक्ष्यांक उपलब्धतेपेक्षा कमी असल्यामुळे, आयोगाने आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी अचूक समायोजित केलेल्या स्थिर आकारांच्या यथा-प्रमाण तत्त्वावर कमी वसूलीस मंजूरी दिली.

(चार) आयोगाने आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी स्वीकारलेल्या दृष्टीकोनास अनुसरुन, आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या इंधन खर्चाच्या तात्पुरत्या अचूक समायोजनेसाठी, कोळशाचे तेच मिश्रण म्हणजेच केंद्र क्रमांक २ साठी वेस्टर्न कोल फिल्ड्सकडून खर्चाच्या १०० टक्के अधिक कोळसा आणि केंद्र क्र. १ साठी साऊथ ईस्टर्न कोल फिल्ड्स लि. कडून १०० टक्के लिंकेज कोळसा विचारात घेतला, ज्याच्या आधारे आर्थिक वर्ष २०१५-१६ चा वीज दर मंजूर करण्यात आला.

(पाच) आयोगाने ८५ टक्के प्रमाणकानुसार उपलब्धता आणि संयंत्र भार घटक (पीएलएफ) मंजूर केला आणि तिसऱ्या नियंत्रण कालावधीकरिता वीज दर मंजूर केला.

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.- निर्मितीची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. १४)**

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.-निर्मितीने (आरइन्फ्रा- निर्मिती) रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. - वितरण (आरइन्फ्रा-वितरण) बरोबर त्यांच्या डहाणू येथील ५०० मेगावॅटच्या औष्णिक निर्मितीमधून वीज खरेदीसाठी दीर्घ-कालीन वीज खरेदी करार केला आहे. बहु-वर्षीय वीज दराच्या याचिकेसंबंधात तांत्रिक वैधता बैठक झाल्यानंतर जनतेचे अभिप्राय मागविण्यात आले आणि दि. १२ एप्रिल २०१६ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली. आयोगाने खालील ठळक मुद्यांसह दि. १८ ऑगस्ट २०१६ रोजी आपला आदेश निर्गमित केला.

(एक) आयोगाने आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी रु. ११.११ कोटीच्या महसुली शिलकेस मंजुरी दिली. आयोगाने ९१.६० टक्के उपलब्धता मंजूर केली आणि लक्ष्यांक उपलब्धतेनुसार पूर्ण स्थिर आकाराच्या वसुलीस परवानगी दिली. आयोगाने आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये उच्च संयंत्र भार घटकाच्या कारणामुळे रु. ११.५९ कोटीच्या प्रोत्साहनास मंजूरी दिली.

(दोन) आयोगाने बहु-वर्षीय वीज दराच्या विनियमांनुसार तिसऱ्या बहु-वर्षीय वीज दराच्या नियंत्रण कालावधीसाठी वीज दर आणि परिचालनाचे मापदंड मंजूर केले.

(तीन) आयोगाने आरइन्फ्रा-निर्मितीला निर्देश दिले की त्यांनी आयात इंधनाची खरेदी आणि संबंधित व्यवस्था (उदा. वाहतूक, बार्जिग इत्यादी) आवश्यक असेल तेथे आंतर-राष्ट्रीय बोलींसह स्पर्धात्मक बोलीच्या पारदर्शक प्रक्रियेद्वारे आणि खुल्या निविदांद्वारे चौकशी करून त्यांचे तपशील बोलींच्या मूल्यांकन अहवालासह सादर करावेत. आयोगाने निरीक्षण नोंदविले की आयात कोळशाची खरेदी अल्प-कालीन करारापेक्षा दीर्घ-कालीन कराराद्वारे केल्यास ती कमी किंमतीत होते. यामुळे, आयोगाने निर्णय दिला की आरइन्फ्रा-निर्मितीने कोळशाच्या योग्य निर्देशांकाशी निगडीत असलेल्या कोळशासाठी दीर्घ -कालीन करार करण्याचा विचार करावा.

(चार) आरइन्फ्रा–निर्मितीने आरइन्फ्रा–वितरण बरोबर वीज खरेदी करार केला आहे, जो तिसऱ्या नियंत्रण कालावधीच्या मध्यावर सन २०१८ मध्ये संपत आहे. आयोगाने आरइंफ्रा-निर्मितीला त्यांच्या भावी निर्मितीच्या विक्री व्यवस्थेस मंजुरीकरिता या वीज खरेदी कराराच्या समाप्तीच्या कमीत कमी ६ महिने अगोदर आपली याचिका सादर करण्याचे निर्देश दिले.

**टाटा पॉवर कंपनी लि.- निर्मितीची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. ३२)**

टीपीसी –निर्मितीने टीपीसी वितरण आणि बेस्ट कंपनीबरोबर दीर्घकालीन वीज खरेदी करार केला आहे. टाटा पॉवर कंपनी लि.-निर्मितीच्या (टीपीसी-निर्मिती) बहु-वर्षीय वीज दराच्या याचिकेवर तांत्रिक छाननी बैठक झाल्यानंतर जनतेचे अभिप्राय मागविण्यात आले आणि दि. २६ एप्रिल २०१६ रोजी जाहीर सुनावणी घेण्यात आली. आयोगाने खालील ठळक मुद्यांसह दि. ८ ऑगस्ट २०१६ रोजी आपला आदेश निर्गमित केलाः

(एक) टीपीसी-वितरण आणि बेस्ट कंपनीबरोबर करण्यात आलेला वीज खरेदी करार २०१८ मध्ये संपणार असल्यामुळे, टीपीसी -निर्मितीने विद्यमान वीज खरेदी करारांच्या समाप्तीच्या कमीत कमी ६ महिने अगोदर त्यांच्या भावी निर्मितीच्या विक्रीच्या व्यवस्थेस मंजुरीसाठी याचिका सादर करण्याचे निर्देश आयोगाने टीपीसी-निर्मितीला दिले.

(दोन) आयोगाने टीपीसी- निर्मितीच्या ट्रॉम्बे औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या संच ७ च्या दुरुस्तीसाठी सक्तीने बंद (आऊटेज) करण्यासंबंधीचा अहवाल विचारात घेऊन असे निरीक्षण नोंदविले की, टीपीसी- निर्मितीने लहान व मोठ्या आऊटेजच्या दरम्यान मूळ उत्पादकांनी (ओईएम) विनिर्दिष्ट केलेल्या देखभालीच्या वेळापत्रकाचे पालन केले आहे. आयोगाने असा निर्णय दिला की, या घटना टीपीसी- निर्मितीच्या वाजवी नियंत्रणाच्या बाहेर होत्या.

(तीन) सन जानेवारी २०१४ मधील संच-८ च्या सक्तीच्या आऊटेजबाबत, टीपीसी-निर्मितीने आयोगाच्या यापूर्वीच्या निर्देशांना सविस्तर उत्तरे दिली आणि सोबत समर्थनार्थ आवश्यक माहितीही दिली, हे विचारात घेऊन आयोगाचे असे मत झाले की संच-८ चे सक्तीचे आऊटेज, टीपीसी-निर्मितीच्या नियंत्रणाबाहेर होते.

(चार) संच- ६ चे संचालन हे अपवादात्मक स्वरूपाचे आहे आणि त्यासाठी संच कमी व अनियमित भारावर चालवावा लागतो. ही बाब विचारात घेऊन आयोगाने टीपीसी- निर्मितीने केलेल्या दाव्यानुसार, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या निर्देशांखाली केलेल्या रु. ७९२.११ कोटीच्या प्रत्यक्ष इंधन खर्चास आणि रु. २४.१३ कोटीच्या परिचालन खर्चास अनुक्रमे आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि २०१५-१६ करिता मंजुरी दिली.

(पाच) आयोगाने बेस्ट, टीपीसी-वितरण आणि आरइन्फ्रा-वितरण या वितरण परवानाधारकांकडून मागील काळातील रु. ६९.०१ कोटीच्या नक्त रकमेच्या वसूलीला मंजूरी दिली.

(सहा) संच ४ चा उपयुक्त कालावधी संपला असल्यामुळे आणि ते काही काळ वापरात नसल्याने, आयोगाने तिसऱ्या नियंत्रण कालावधीतील नक्त एकूण वसूली गरज काढण्यासाठी स्थिर आकार कमी केले.

(सात) आयोगाने संच ४ ते ७, संच ८ आणि टीपीसी निर्मितीच्या जल विद्युत निर्मिती केंद्राकरिता तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी प्रत्येक वर्षसाठी वेगळे वार्षिक स्थिर आकार मंजूर केले.

## विजेचे पारेषण

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.- पारेषणची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (२०१६ चे प्रकरण क्र.१३)**

तांत्रिक वैधता बैठक झाल्यानंतर आयोगाने जनतेकडून अभिप्राय मागविले आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.- पारेषणच्या बहुवर्षीय वीज दराच्या याचिकेवर १३ एप्रिल २०१६ रोजी जाहीर सुनावणी घेतली. आयोगाने खालील ठळक वैशिष्ट्यांसह दि. २२ जून २०१६ रोजी आदेश निर्गमित केला.

(एक) आयोगाने आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या अचूक समायोजनासाठी नंतरच्या वर्षांच्या वीज दरामध्ये समायोजन करण्यासाठी रु. २१.३२ कोटीची महसुली शिल्लक मंजूर केली.

(दोन) आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी तात्पुरते अचूक समायोजन केल्यानंतर, आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी एकूण महसूली गरज रु. २९४.२० कोटी इतकी झाली. आर्थिक वर्ष २०१३-१४ पर्यंतची रु. १२.९४ कोटीचा संचित महसूली तूट, आर्थिक वर्ष २०१४-१५ ची रु. २१.३२ कोटीची महसूली शिल्लक आणि विद्युत अपिलीय न्यायाधिकरणाच्या निकालाचा रु. ८.७२ कोटीचा परिणाम, विचारात घेऊन, आयोगाने नंतरच्या वर्षांकरिता, वीज दरांमध्ये समायोजित करण्यासाठी रु. ५.०४ कोटीची संचित महसुली तूट मंजूर केली.

(तीन) आयोगाने, आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी रु. २९२.७९ कोटी, आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी रु. ३१०.१५ कोटी, आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी रु. ३२०.१५ कोटी, आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी रु. ३१५.३३ कोटींच्या पारेषण आकाराच्या माध्यमातून केलेल्या एकूण वसूलीस मान्यता दिली.

**टाटा पॉवर कंपनी लि.- पारेषणची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (२०१६ चे प्रकरण क्र. २२)**

तांत्रिक छाननी बैठक घेतल्यावर आयोगाने जनतेकडून अभिप्राय मागविले आणि टीपीसी-पारेषणच्या बहुवर्षीय वीज दराच्या याचिकेवर जाहीर सुनावणी दि. २० एप्रिल २०१६ रोजी घेतली. आयोगाने खालील ठळक वैशिष्ट्यांसह आपला आदेश दि. ३० जून २०१६ रोजी निर्गमित केला:

(एक) आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी अंतिम अचूक समायोजनानंतर टीपीसी-पारेषणच्या रु. ९७.४३ कोटीच्या महसुली शिलकीच्या मागणीऐवजी आयोगाने रु. ११४.३३ कोटींची महसूली शिल्लक मंजूर केली.

(दोन) आर्थिक वर्ष २०१५-१६ चे तात्पुरते अचूक समायोजन केल्यानंतर टीपीसी-पारेषणच्या रु. ६९१.६२ कोटीच्या मागणीऐवजी, आयोगाने रु. ५३४.७६ कोटींची एकूण महसुली गरज मंजूर केली. तसेच, टीपीसी-पारेषणने आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी रु. २४६.४८ कोटीची मागणी केली असताना आयोगाने त्या वर्षातील रु. ८९.६२ कोटीची तात्पुरती तूट मंजूर केली.

(तीन) आयोगाने टीपीसी-पारेषणसाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी रु. ५६२.११ कोटी, आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी रु.६६१.६८ कोटी, आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी रु. ७११.०९ कोटी, आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी रु. ७४५.८९ कोटीची एकूण महसूली गरज मंजूर केली, जी पारेषण दराच्या माध्यमातून वसूल करावयाची आहे.

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि.ची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (२०१६ चे प्रकरण क्र. ३१)**

तांत्रिक छाननी बैठक झाल्यानंतर आयोगाने जनतेकडून अभिप्राय मागविले आणि महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लि.ची बहु-वर्षीय वीज दराची याचिकेवर दि. १७ मे २०१६ रोजी जाहीर सुनावणी घेतली. आयोगाने खालील ठळक मुद्यांसह दि. ७ जुलै २०१६ रोजी आपला आदेश निर्गमित केला.

(एक) महापारेषण कंपनीची रु. २०६.४२ कोटीची मागणी असताना, आयोगाने पूर्वी नाकारलेल्या रु. ७५.३३ कोटीच्या भांडवलीकरणास मंजूरी दिली. याशिवाय, आयोगाने पूर्वी नाकारलेल्या भांडवलीकरणास मंजुरी दिल्यामुळे रु. ८.२३ कोटीचा नक्त परिणामास देखील मंजुरी दिली. हा परिणाम आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये पारेषण दराच्या माध्यमातून वसूल करण्यासाठी विचारात घेण्यात येईल.

(दोन) आयोगाने आर्थिक वर्ष २०१४-१५ चे अचूक समायोजन केल्यानंतर रु. १११४.७५ कोटीची संचित महसूली शिल्लक मंजूर केली, जी आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या एकूण महसुली गरजेतून वसूल करावयाची आहे आणि आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ चे तात्पुरते अचूक समायोजन केल्यानंतर रु. १३३७.७९ कोटीची संचित महसूली शिल्लक मंजूर केली, जिचे आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या एकूण महसूली गरजेत समायोजन करावयाचे आहे.

(तीन) आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-१७, आर्थिक वर्ष २०१७-१८, आर्थिक वर्ष २०१८-१९, आणि आर्थिक वर्ष २०१९-२०साठी अनुक्रमे रु. १,७४४.७० कोटी, रु. ३,४९९.०३ कोटी, रु. ४,१८९.७४ कोटी, आणि रु. ४,२७७.१८ कोटीच्या एकूण महसुली गरजेस मंजुरी दिली, जी नंतरच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या दराच्या आदेशाच्या माध्यमातून वसूल करावयाची आहे.

**महाराष्ट्र ईस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि.ची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (२०१६ चे प्रकरण क्र.५०)**

तांत्रिक वैधता बैठक झाल्यानंतर जनतेकडून अभिप्राय मागविण्यात आले आणि महाराष्ट्र ईस्टर्न ग्रिड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि.च्या बहु-वर्षीय वीज दराची याचिकेवर आयोगाने ६ मे २०१६ रोजी जाहीर सुनावणी घेतली. आयोगाने खालील ठळक मुद्यांसह दि. ५ जुलै २०१६ रोजी आपला आदेश निर्गमित केला.

(एक) प्रकल्प सुरु झाल्यानंतर प्रकल्पाच्या भांडवली खर्चाची प्रत्यक्ष आणि आर्थिक पडताळणी त्रयस्थ कंपनीकडून आयोजित करण्यात येईल आणि त्यानंतरच आयोगाकडून प्रकल्पाच्या अंतिम खर्चास मंजूरी देण्यात येईल.

(दोन) महानिर्मिती कंपनीची रू. ५६.२६ कोटीची मागणी असताना, आयोगाने आर्थिक वर्ष २०१३-१४ चे समायोजन केल्यानंतर रू. ४८.२१ कोटीच्या एकूण महसूली गरजेस मान्यता दिली आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये समायोजन करण्यासाठी आयोगाने रू. १.६४ कोटीच्या महसुली शिलकीस मान्यता दिली. पुढील वर्षासाठी मंजूर केलेल्या रकमा खालीलप्रमाणे आहेत:-

- आर्थिक वर्ष २०१४-१५ (अचूक समायोजन): रु. ५९८.३१ कोटीची मागणी असताना, रू. ५६३.८४ कोटीच्या एकूण महसूली गरजेस मंजूरी दिली. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये वसूल करण्यासाठी रू. ७७.५३ कोटीच्या महसुली तुटीस मंजुरी देण्यात आली.
- आर्थिक वर्ष २०१५-१६ (तात्पुरते अचूक समायोजन) : रू. १२७१.१२ कोटीची मागणी केलेली असताना रू. १०५३.९३ कोटीच्या एकूण महसूली गरजेस मंजुरी देण्यात आली. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये वसूल करण्यासाठी रू. ४८३.२२ कोटीची महसुली तूट मंजूर करण्यात आली.
- आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि पुढील ३ वर्षांकरिता :- अनुक्रमे रु. १६४६.१२ कोटी, रु. १०६१.६४ कोटी, रु. १०३४.०७ कोटी, आणि रु. १,००६.६९ कोटीच्या संचित एकूण महसुली गरजेस पारेषण आकाराच्या माध्यमातून वसूल करण्यास मंजुरी देण्यात आली.

**तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेच्या दरास मान्यतेसाठी याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. ९१)**

आयोगाने, आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० दरम्यानच्या तिसया नियंत्रण कालावधीसाठी एकूण पारेषण यंत्रणा खर्च आणि राज्यांतर्गत पारेषण दर निश्चित करण्यासाठी, राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा भाग असलेल्या विविध पारेषण परवानाधारकांच्या अचूक समायोजन केलेल्या रकमांसह अलिकडच्या मान्यताप्राप्त एकूण महसूली गरजा विचारात घेतल्या.

त्यानुसार, जुलै २०१६ पासून लागु असलेल्या आदेशाद्वारे, आयोगाने, आर्थिक वर्ष २०१६-१७, आर्थिक वर्ष २०१७-१८, आर्थिक वर्ष २०१८-१९, आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी अनुक्रमे रु. २०४.२४ कोटी, रु. २३९.८८ कोटी, आणि रु. २५३.८२ कोटी आणि रू. २४२.०८ कोटी प्रति किलोवॅट प्रति महिना असे दीर्घ-कालीन आणि मध्यम-कालीन पारेषण दर मंजूर केले आणि रू. ०.२८,रू. ०.३२,रू. ०३४,रू. ०.३२ प्रति युनिट असे अल्प-कालीन पारेषण दर राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा वापर करणाया उपयोगकर्त्यांसाठी (म्हणजेच वितरण परवानाधारक आणि अन्य उपयोगकर्त्यांसाठी) निश्चित केले.

**महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राची अंदाजपत्रक आणि शुल्क व आकार मंजूर करण्यासाठी याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. २०)**

तांत्रिक वैधता बैठक झाल्यानंतर आयोगाने जनतेकडून अभिप्राय मागविले आणि दि. १२ एप्रिल २०१६ रोजी जाहीर सुनावणी घेतली. आयोगाने खालील ठळक मुद्यांसह दि. २२ जुलै २०१६ रोजी आपला आदेश निर्गमित केला.

(एक) ज्या प्रकरणी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात आणि पूर्वी मंजूर करण्यात आले आहेत अशा योजनांच्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने मागणी केल्याप्रमाणे भांडवलीकरणास मान्यता देण्यात आली. तसेच, ज्या सविस्तर प्रकल्प अहवालाच्या योजना अद्याप सादर करावयाच्या आहेत, अशा योजनांच्या बाबतीत आयोगाने ५० टक्क्यांपर्यंत भांडवलीकरणास मंजूरी दिली. अन्य लहान योजनांच्या बाबतीत, प्रस्तावित भांडवलीकरणाच्या ५० टक्के भांडवलीकरणास, मान्यता दिलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांच्या भांडवलीकरणाच्या २० टक्क्यांच्या अधीन राहून, आयोगाने मान्यता दिली.

(दोन) आयोगाने आर्थिक वर्ष २०१५-१६ चे तात्पुरते अचूक समायोजन केल्यानंतर रू. ७७८.९४ लाखाच्या शिलकीस मान्यता दिली आणि रू. २९३९.५६ लाखाची वाढीव शिल्लक, आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या वार्षिक स्थिर आकारात समायोजित करण्यात आली.

(तीन) मुक्त प्रवेशापासून मिळालेल्या जादा उत्पन्नामुळे रू. २९३९.५६ ची वाढीव शिल्लक रक्कम निर्माण झाली. या शिल्लक रकमेपैकी काही भागाचा वापर, मुक्त प्रवेशातील व्यवहार शुल्क, कमी करण्यासाठी, करता येईल. त्यानुसार, आयोगाने शेड्युलिंग शुल्कात रू. ३०००/- ते रु. २२५०/- प्रति दिन, तर रि-शेड्युलिंग शुल्कात रू. ३०००/- ते रु. २२५०/- प्रति सुधारणा, अशी सुधारणा केली. उर्वरित शिल्लक रक्कम नियंत्रण कालावधीतील वार्षिक स्थिर आकार कमी करण्यासाठी वापरण्यात आली.

(चार) आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी रू. १४८४.१७ लाख, आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी रू. १८७९.६० लाख, आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी रू. १९२५.१९, आर्थिक वर्ष २०१९-२० साठी रू. १९४४.३६ लाखांच्या वार्षिक स्थिर आकारांना मंजुरी दिली.

(पाच) आयोगाने तिसऱ्या नियंत्रण कालावधीतील आर्थिक वर्ष २०१६-१७, आर्थिक वर्ष २०१७-१८, आर्थिक वर्ष २०१८-१९, आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी अनुक्रमे रु. ६५०.७१ प्रति मेगावॅट प्रति महिना, रु. ७७६.६४ प्रति मेगावॅट प्रति महिना, रु. ७४९.५४ प्रति मेगावॅट प्रति महिना, आणि रु. ७१३.१९ प्रति मेगावॅट प्रति महिना असे राज्य भार प्रेषण केंद्र आकार मंजूर केले.

## विजेचे वितरण

### महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.ची बहु-वर्षीय वीज दर याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. ४८)

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण कंपनी)च्या बहु-वर्षीय वीज दराच्या याचिकेवर अनेक तांत्रिक वैधता बैठका पार पडल्यानंतर, आयोगाने जनतेचे अभिप्राय मागविले आणि दि. ११ ते २८ जुलै, २०१६ या कालावधी दरम्यान अमरावती, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, पुणे आणि नवी मुंबई येथे जाहीर सुनावण्या घेतल्या. या प्रकरणी दि. ३ नोव्हेंबर, २०१६ रोजी आयोगाने बहु-वर्षीय वीज दराचा आदेश पारित केला.

महावितरण कंपनीने आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० करिता याचिकेत अंदाजित केलेल्या रु. ५६,३७२ कोटींच्या महुसली तुटीऐवजी, जी त्या कालावधीसाठी त्यांच्या एकूण अंदाजित एकूण महसुली गरजेच्या १९ टक्के होती त्याऐवजी, आयोगाने, रु. ९,१४९ कोटींच्या खूपच कमी महसुली तुटीस, म्हणजेच मंजूर केलेल्या एकूण महसुली गरजेच्या ३.५ टक्के तुटीस, मान्यता दिली.

आयोगाने, मागणी आकारांमध्ये जरी अल्पशी वाढ केली असली तरी, औद्योगिक वीज दराचे सुसुत्रीकरण करण्याची प्रक्रिया पुढे चालू ठेवली आहे. पुढील चार वर्षांमध्ये, उच्च दाब आणि लघु दाब उद्योगाच्या सरासरी आकारणी दरामध्ये अल्पशी (सुमारे ०.४ ते ०.५ टक्के इतकी) वाढ होण्याची शक्यता आहे.

आयोगाने, प्रथमच वीज दरातील अस्थिर आकारांच्या भागाची वहन आकार आणि ऊर्जा आकार अशा दोन भागात विभागणी केली आहे. यामुळे, उच्च दाब ग्राहकांना विजेचा पुरवठा अति-उच्च दाब (६६ केव्ही आणि वर), ३३ केव्ही, २२ केव्ही किंवा ११ केव्ही यापैकी कोणत्या पातळीवर करण्यात येत आहे त्यावर अवलंबून उच्च-दाब ग्राहकांच्या एकाच वर्गवारीतील वीज पुरवठ्याचे ऊर्जा आकार कायम ठेवून वेगवेगळ्या वहन आकारांची परिगणना करुन, त्यांना व्होल्टेजवर आधारित वेगवेगळा वीज दर लागू केला.

वीज पुरवठ्याच्या उपलब्धतेत झालेली सुधारणा विचारात घेऊन, आयोगाने उच्च-दाब ग्राहकांच्या अखंडीत आणि खंडीत पुरवठ्याच्या दोन उप-वर्गवारी एकत्रित केल्या.

प्रत्येक वर्षात निवासी ग्राहकांच्या सरासरी आकारणी दरामध्ये १.० टक्के ते १.३ टक्क्यांच्या मर्यादेत अल्पशी वाढ करण्यात आली. वीज दरातील दारिद्रय रेषेखालील (बीपीएल) निवासी ग्राहकांची वर्गवारी, ज्या ग्राहकांचा मंजूर भार पूर्वी ०.१ किलोवॅटच्या मर्यादेत होता तो आता ०.२५ किलोवॅटपर्यंत वाढविण्यात आला आहे.

कृषी ग्राहक वर्गवारीच्या वीज दरामध्ये थोड्या प्रमाणात वाढ केली असली तरी हा सुधारित वीज दर सरासरी पुरवठा खर्चाच्या फक्त ५० टक्क्यांहून थोडासाच जास्त असेल. तथापि, सुमारे ३६ टक्के कृषी ग्राहकांच्या जोडण्यांवर अद्यापही मीटर बसविण्यात आलेली नाहीत. कृषी जोडण्यांवर मीटर बसविण्याच्या प्रक्रियेला चालना देण्याच्या हेतूने, मीटर बसविलेल्या पंप संचांपेक्षा मीटर न बसविलेल्या कृषी पंपांकरिता, विशेषतः ज्यांचा संलग्न भार ७.५ एचपी पेक्षा जास्त असेल त्यांच्या वीज दरात, आयोगाने लक्षणीय जास्त वाढ केली आहे.

महाराष्ट्रात नव्याने सुरु होणाऱ्या सार्वजनिक वाहतुकीचे प्रकार विचारात घेऊन, आयोगाने सर्व रेल्वे, मेट्रो आणि मोनोरेल या सर्वांचे वीज दर एकत्रित केले आहेत. पायाभूत अणि अन्य बांधकामासाठी तात्पुरत्या जोडण्यांसाठीच्या उच्च वीज दरात कपात करण्यात येऊन तो वाणिज्यिक वीज दराच्या जवळ आणण्यात आला.

आयोगाने महावितरण कंपनीसह महाराष्ट्रातील सर्व वितरण परवानाधारकांच्या वीज दरांच्या अनुसूचींचे सुसुत्रीकरण, केले असून वीज दराच्या प्रत्येक वर्गवारीच्या व्याख्येत आणि व्याप्तीमध्ये एकसारखेपणा आणला आहे.

विद्युत अधिनियम, २००३ व राष्ट्रीय वीज दर धोरणात अभिप्रेत असल्याप्रमाणे, आयोगाने निरनिराळ्या ग्राहक वर्गवारी अंतर्गत असणाऱ्या क्रॉस सबसिडीच्या पातळ्या, म्हणजेच एका वर्गवारीच्या ग्राहकांनी दुसऱ्या वर्गवारीच्या ग्राहकांना क्रॉस सबसिडी देण्याच्या किंवा क्रॉस सबसिडी घेण्याच्या पातळीमध्ये, कमी केल्या.

आयोगाने विद्युत अधिनियम, २००३ व राष्ट्रीय वीज दर धोरणामध्ये घालून देण्यात आलेल्या तत्त्वांना अनुसरुन मुक्त प्रवेश ग्राहकांना अतिरिक्त अधिभार नव्याने लागू केला आहे आणि त्यांनी अदा करावयाचा क्रॉस सबसिडी अधिभार निश्चित केला.

बहुतांश ग्राहक वर्गवारींनी देय असलेल्या स्थिर/मागणी आकारात थोड्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे, जेणेकरुन ते आतापेक्षा जास्त स्थिर खर्चाची वसूली करतील.

महावितरण कंपनीने कृषी वर्गवारीला केलेल्या वीज विक्रीचे अंदाज जास्त केल्याचे दिसून आल्याने आयोगाने ते स्वीकारले नाहीत. त्याऐवजी आयोगाने कृषी पंपांसाठीच्या अलग केलेल्या फिडर्सच्या लेखाविषयक माहितीचे विश्लेषण करुन या पंपांना केलेल्या विजेच्या विक्रीची निश्चिती करण्यासाठी मंडल-निहाय कृषी वीज वापराचा निर्देशांक निश्चित केला. त्याच्या आधारे, आयोगाने २०१४-१५ करिता १६.३६ टक्के आणि २०१५-१६ करिता १८.२४ टक्के इतक्या वितरण हानिची फेरनिश्चिती केली. (महावितरण कंपनीने अनुक्रमे १४.१७ टक्के आणि १४.५१ टक्के इतक्या कमी पातळीवर वितरण हानीचा दावा केला होता.)

आता अंदाजित केलेल्या हानीतील वाढीचा दोन तृतियांश भाग महावितरण कंपनीने सहन करावयाचा असून उर्वरीत भाग ग्राहकांना सहन करावा लागणार आहे. सन २०१७ च्या अखेरीस मध्यावधी कामगिरीचा आढावा घेताना वितरण हानीच्या पातळीचा पुनर्विचार करण्यात येईल आणि तोपर्यंत एमएसईबी होल्डींग कंपनीकडून मुंबई येथील इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी मार्फत (आयआयटी) कृषी फिडर्सकडून करण्यात येत असलेल्या विजेच्या वापराचा अभ्यास देखील उपलब्ध होईल.

कमी खर्चाची वीज प्रथम खरेदी करणे या मेरिट ऑर्डर डिस्पॅच च्या तत्त्वावर आधारित आणि महिना-निहाय ऊर्जेच्या गरजांचा अंदाज आणि विविध स्त्रोतांकडून करारबध्द केलेल्या विजेची उपलब्धता विचारात घेऊन आयोगाने प्रस्तावित आर्थिक वर्ष २०१९-२० पर्यंतच्या वीज खरेदीस आणि खर्चास मंजुरी दिली. या संबंधात अशी अपेक्षा आहे की, २०१६-१७ मध्ये सुमारे २५००० दशलक्ष युनिट इतक्या मोठ्या प्रमाणावर शिल्लक वीज उपलब्ध होईल आणि त्यामध्ये आर्थिक वर्ष २०१९-२० च्या अखेरीस ४२००० दशलक्ष युनिट्सपर्यंत लक्षणीय वाढ होऊ शकेल. आयोगाने महावितरण कंपनीला त्यांच्याकडे शिल्लक असणारी वीज विकण्यासाठीचे पर्याय तपासून पाहण्याचे निर्देश दिले. तसेच अद्याप जे निर्मिती संच उभारावयाचे आहेत अशा संचांबरोबर महावितरण कंपनीने जे वीज खरेदीचे करार केलेले आहेत ते करार स्थगित ठेवण्याच्या शक्यतेसह त्यांचा आढावा घेण्याचे निर्देश आयोगाने महावितरण कंपनीला दिले.

महावितरण कंपनीने २०१३-१४ पर्यंतच्या नूतनशील ऊर्जा खरेदी बंधनाची पूर्तता न केल्यामुळे आयोगाने महावितरण कंपनीच्या एकूण महसुली गरजेत सुमारे २६० कोटींची कपात केली .

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.-वितरणची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. ३४)**

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.-वितरणच्या बहु-वर्षीय वीज दर याचिकेवर तांत्रिक वैधता बैठका पार पडल्यानंतर आयोगाने जनतेकडून अभिप्राय मागविले आणि २८ एप्रिल, २०१६ रोजी जाहीर सुनावणी घेतली. या प्रकरणी आयोगाने दि. २१ ऑक्टोबर, २०१६ रोजी वीज दराचा आदेश पारित केला.

आरइन्फ्रा-वितरणने चालू आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता सरासरी वीज दरामध्ये मागितलेल्या ६ टक्के वाढीऐवजी, आयोगाने एकुणात १.९३ टक्के कपात मंजूर केली आहे. तसेच त्यानंतरच्या म्हणजेच २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या आर्थिक वर्षांसाठी, आरइन्फ्रा-वितरणने प्रस्तावित केलेल्या ३ टक्के वार्षिक वाढीऐवजी, आयोगाने सरासरी वीज दर अनुक्रमे ०.७६ , १.०६ आणि १५.१३ टक्क्यांनी कमी केला आहे.

नियामक मत्तांच्या शिल्लक येणे रकमांची वसुली तोपर्यंत पूर्ण होणार असल्यामुळे देखील आर्थिक वर्ष २०१९-२० च्या सरासरी वीज दरामध्ये मोठी कपात करण्यात आली आहे. तथापि, मध्यावधी आढाव्यानंतर, जो आर्थिक वर्ष २०१८-१९ च्या सुरुवातीला पूर्ण करण्यात येईल, त्या टप्प्यावर २०१५-१६ आणि २०१६-१७ चे अचूक समायोजन विचारात घेऊन २०१८-१९ आणि २०१९-२०च्या आता मंजूर केलेल्या वीज दरामध्ये बदल होऊ शकेल.

वेगवेगळ्या वितरण परवानाधारकांकडून एकाच वर्गवारीतील ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या विजेच्या दरामधील मोठी विषमता शक्य तितकी टप्प्याटप्प्याने कमी करणे योग्य राहील. आरइन्फ्रा-वितरण आणि टीपीसी-वितरण यांच्या वीज दरांतील भिन्नतेमधील कपातीमुळे स्पर्धात्मकतेस चालना मिळेल आणि दर्जेदार सेवेच्या आधारावरच परवानाधारकाची निवड करण्याचा पर्याय ग्राहकांना उपलब्ध राहील. तथापि, अशी तुलना, टीपीसी-वितरणच्या बहुतांश ग्राहकांना आरइन्फ्रा-वितरणच्या वितरण जाळ्यामधून वीज पुरवठा करण्यात येत असल्यामुळे आणि अशा प्रकरणी लागू असलेले आकार वेगवेगळे असल्यामुळे, आरइन्फ्रा-वितरण आणि टीपीसी-वितरणच्या वीज दरांमधील तुलना आरइन्फ्रा-वितरणच्या थेट ग्राहकांचे वीज दर आणि टीपीसी-वितरणच्या चेंजओव्हर ग्राहकांकरिता असलेल्या वीज दरांमध्ये, करणे आवश्यक आहे.

आयोगाने, ०-१०० युनिट्स वापर करणाऱ्या निवासी वर्गवारीतील टीपीसी-वितरण आणि आरइन्फ्रा- वितरणचे वीज दर ढोबळमानाने समान ठेवले आहेत.

आयोगाने 'सार्वजनिक पाणीपुरवठा योजना आणि सांडपाणी व मलनिःस्सारण प्रकल्प' नावाची एक नवीन वर्गवारी निर्माण केली आहे. या वर्गवारीतील सरासरी आकारणीचा दर हा वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चापेक्षा कमी आहे. तसेच आयोगाने पायाभूत अणि अन्य बांधकामासाठी तात्पुरत्या जोडण्यांच्या वीज दराचे देखील सुसूत्रीकरण केले आहे.

मुंबईत नव्याने सुरु होणारे सार्वजनिक वाहतुकीचे विविध प्रकार विचारात घेऊन, आयोगाने रेल्वे, मेट्रो आणि मोनोरेल या सर्वांचे वीज दर एकत्रित केले आहेत.

आयोगाने क्रॉस सबसिडीच्या पातळ्यांमध्ये कपात केली आहे.

सर्व ग्राहक वर्गवारींनी देय असलेल्या स्थिर/मागणी आकारात थोड्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे, जेणेकरुन ते आतापेक्षा जास्त स्थिर खर्चाची वसूली करतील.

आरइन्फ्रा-वितरणच्या एकूण खर्चांपैकी वीज खरेदीवर होणारा खर्चाचा भाग मुख्य असून तो ग्राहकांकडून वीज दराच्या माध्यमातून वसूल करण्यात येतो. रिलायन्स कंपनीच्या डहाणू येथील निर्मिती प्रकल्पाशी असलेला वीज खरेदी करार सन २०१८ मध्ये संपणार असल्यामुळे, आरइन्फ्रा-वितरणने डहाणू येथून किंवा अन्य कोठूनही किंवा स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेसह अन्य पर्यायांकडून, भविष्यात करावयाच्या वीज खरेदीची योजना तीन महिन्यांच्या आत मंजुरीसाठी सादर करण्याचे आयोगाने आरइन्फ्रा-वितरणला निर्देश दिले आहेत.

**टीपीसी-वितरणची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. ४७)**

टीपीसी-वितरणच्या बहु-वर्षीय वीज दर याचिकेवर तांत्रिक वैधता बैठका पार पडल्यानंतर आयोगाने जनतेकडून अभिप्राय मागविले आणि २४ मे, २०१६ रोजी जाहीर सुनावणी घेतली. या प्रकरणी दि. २१ ऑक्टोबर, २०१६ रोजी आयोगाने वीज दराचा आदेश पारित केला. टीपीसी-वितरणने चालू आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता सरासरी वीज दरामध्ये मागितलेल्या १७ टक्के कपाती (नियामक मत्ता आकार (आरएसी वगळून) ऐवजी, आयोगाने एकुणात १.८५ टक्के वाढ (आरएसी सह) मंजूर केली आहे. २०१७-१८ आणि २०१८-१९ या आर्थिक वर्षांमध्ये देखील, आयोगाने अनुक्रमे सरासरी वीज दर २.२६ आणि २.५१ टक्के वाढविला आहे आणि २०१९-२० मध्ये सरासरी वीज दर १४.९३ टक्क्यांनी कमी (आरएसी सह) केला आहे.

आर्थिक वर्ष २०१९-२० च्या सरासरी वीज दरामध्ये, मुख्यत्वेकरुन २०१८-१९ पर्यंत नियामक मत्तांच्या शिल्लक येणे रकमांची वसुली पूर्ण होणार असल्यामुळे, मोठी कपात करण्यात आली आहे.

कमी वीज वापर असणाऱ्या टीपीसी-वितरणच्या बहुतांश निवासी ग्राहकांना आरइन्फ्रा-वितरणच्या जाळ्यामधून टीपीसी-वितरणकडून वीज पुरवठा करण्यात येतो आणि त्यांचा वीज दर कमी करण्यात आला आहे. या वर्गवारीतील टीपीसी-वितरणच्या थेट ग्राहकांच्या, ज्यांची संख्या कमी आहे, वीज दरात वाढ करण्यात आली असली तरी ते आरइन्फ्रा-वितरण आणि मुंबईतील अन्य वितरण परवानाधारकांच्या या वर्गवारीतील ग्राहकांपेक्षा कमी रक्कम अदा करतील. भारतीय रेल्वे हा टीपीसी-वितरणचा आता ग्राहक राहिला नसल्यामुळे आणि अन्य काही मोठे ग्राहक मुक्त प्रवेशाच्या माध्यमातून अन्य स्त्रोतांकडून वीज पुरवठा घेऊ लागल्यामुळे काही वर्गवारीतील ग्राहकांच्या वीज दरात अशी वाढ झाली आहे.

आयोगाने 'सार्वजनिक पाणीपुरवठा योजना आणि सांडपाणी व मलनिःस्सारण प्रकल्प' नावाची एक नवीन वर्गवारी निर्माण केली आहे. या वर्गवारीतील सरासरी आकारणीचा दर हा वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चापेक्षा कमी आहे. आयोगाने पायाभूत आणि अन्य बांधकामासाठी तात्पुरत्या जोडण्यांच्या वीज दराचेही सुसूत्रीकरण केले आहे.

मुंबईत नव्याने सुरु होणारे सार्वजनिक वाहतुकीचे विविध प्रकार विचारात घेऊन, आयोगाने रेल्वे, मेट्रो आणि मोनोरेल या सर्वांचे वीज दर एकत्रित केले आहेत.

विद्युत अधिनियम, २००३ व राष्ट्रीय वीज दर धोरणात अभिप्रेत असल्याप्रमाणे, आयोगाने टीपीसी-वितरणच्या वीज दरातील निरनिराळ्या ग्राहक वर्गवारी अंतर्गत असणाऱ्या क्रॉस सबसिडीच्या पातळीमध्ये, म्हणजेच एका वर्गवारीच्या ग्राहकांनी दुसऱ्या वर्गवारीतील ग्राहकांना क्रॉस सबसिडी देण्याच्या किंवा क्रॉस सबसिडी घेण्याच्या पातळीमध्ये, कपात केली आहे.

सर्व ग्राहक वर्गवारींनी देय असलेल्या स्थिर/मागणी आकारात थोड्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे, जेणेकरुन ते आतापेक्षा जास्त स्थिर खर्चाची वसूली करतील.

टीपीसी-वितरणच्या एकूण खर्चांपैकी वीज खरेदीवर होणाऱ्या खर्चाचा भाग मुख्य असून तो ग्राहकांकडून वीज दराच्या मध्यमातून वसूल करण्यात येतो. टीपीसी-वितरणचा त्यांच्या ट्रॉम्बे येथील निर्मिती प्रकल्पाशी असलेला वीज खरेदी करार सन २०१८ मध्ये संपणार असल्यामुळे, टीपीसी-वितरणने ट्रॉम्बे येथून किंवा अन्य कोठूनही किवा स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेसह अन्य पर्यायांकडून, भविष्यातील वीज खरेदीची योजना तीन महिन्यांच्या आत मंजूरीसाठी सादर करण्याचे आयोगाने टीपीसी-वितरणला निर्देश दिले आहेत.

**बेस्ट उपक्रमाची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. ३३)**

बेस्ट उपक्रमाच्या बहु-वर्षीय वीज दर याचिकेवर तांत्रिक वैधता बैठका पार पडल्यानंतर आयोगाने जनतेकडून अभिप्राय मागविले आणि २५ मे, २०१६ रोजी जाहीर सुनावणी घेतली. आयोगाने या प्रकरणी दि. २८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वीज दराचा आदेश पारित केला. आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ पासून वाहतूक विभागाच्या तोट्याची वसुली (टीडीएलआर) आकाराची वसुली बंद केली आहे (ज्यामधून बेस्ट उपक्रम त्यांच्या वीज ग्राहकांकडून वाहतूक तोटा वसुल करीत असे). चालू आर्थिक वर्षातील एप्रिल ते सप्टेंबर, २०१६ पर्यंत वसूल करण्यात आलेली रक्कम ग्राहकांना एकूण महसुली गरजेतील समायोजनातून परत करण्यात आली.

विद्युत अपिलीय न्यायाधिकरणाने दि. ३१ ऑक्टोबर, २०१४ रोजी दिलेला निकाल (आणि आयोगाचा दि. २० एप्रिल, २०१६ रोजीचा टीडीएलआर आकार नामंजूर करण्याचा आदेश) सर्वोच्च न्यायालयाच्या विचाराधीन असल्याने व या निकालास रद्द केलेले नसल्याने किंवा त्यास स्थगिती दिलेली नसल्याने, आयोगाने, मागील वर्षांपर्यंत टीडीएलआर आकाराच्या माध्यमातून बेस्टने केलेली वसुली ग्राहकांना आनुषंगिक खर्चासह परत कराव्या लागणाऱ्या रकमेची परिगणना केली असून, ती अंदाजे रु. ३१९५ कोटी इतकी येते. सन २०१६-१७ आणि पुढील तीन वर्षांमध्ये प्रस्तावित केलेल्या या परताव्याची परिगणना देखील आयोगाने ग्राहक वर्गवारी-निहाय केली आहे. तथापि, सर्वोच्च न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत मागील वर्षांतील या वसुलीचा परतावा करण्यात येणार नाही.

आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता सरासरी वीज दरात एकूणात ७ टक्के कपात केली आहे. तसेच सरासरी वीज दरात २०१७-१८ मध्ये ६ टक्के, २०१८-१९ मध्ये ६ टक्के आणि २०१९-२० मध्ये ५ टक्क्यांनी आणखी कपात केली आहे.

आयोगाने 'सार्वजनिक पाणीपुरवठा योजना आणि सांडपाणी व मलनिःस्सारण प्रकल्प' नावाची एक नवीन वर्गवारी निर्माण केली आहे. या वर्गवारीतील सरासरी आकारणीचा दर हा वीज पुरवठ्याच्या सरासरी खर्चापेक्षा कमी आहे. आयोगाने पायाभूत अणि अन्य बांधकामासाठी तात्पुरत्या जोडण्यांच्या वीज दराचेही सुसुत्रीकरण केले आहे.

मुंबईत नव्याने सुरु होणारे सार्वजनिक वाहतुकीचे विविध प्रकार विचारात घेऊन, आयोगाने रेल्वे, मेट्रो आणि मोनोरेल या सर्वांचे वीज दर बेस्टसाठी निर्माण केलेल्या नव्या वर्गवारीखाली एकत्रित केले आहेत.

आयोगाने बेस्टच्या वीज दरातील क्रॉस सबसिडीच्या पातळ्यांमध्ये कपात केली आहे.

सर्व ग्राहक वर्गवारींनी देय असलेल्या स्थिर/मागणी आकारात थोड्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे, जेणेकरुन ते आतापेक्षा जास्त स्थिर खर्चाची वसुली करतील.

बेस्टच्या एकूण खर्चांपैकी वीज खरेदीवर होणारा खर्चाचा भाग मुख्य असून तो ग्राहकांकडून वीज दराच्या माध्यमातून वसूल करण्यात येतो. टाटा पॉवर कंपनीच्या ट्रॉम्बे येथील निर्मिती प्रकल्पासोबत असलेला वीज खरेदी करार सन २०१८ मध्ये संपणार असल्यामुळे, बेस्टने ट्रॉम्बे येथून किंवा अन्य कोठूनही किंवा स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेसह अन्य पर्यायांकडूनही, भविष्यात करावयाच्या वीज खरेदीची योजना मंजुरीसाठी तीन महिन्यांच्या आत सादर करण्याचे आयोगाने बेस्टला निर्देश दिले आहेत.

**माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रा.लि.ची बहु-वर्षीय वीज दराची याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. १०)**

माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रा. लि. (एमबीपीपीएल) (पूर्वीची सिरीन प्रॉपर्टीज प्रा. लि.) च्या बहु-वर्षीय वीज दराच्या याचिकेवर आयोगाने जनतेकडून अभिप्राय मागविले आणि १८ एप्रिल, २०१६ रोजी जाहीर सुनावणी घेतली. दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजीचा आदेश एमबीपीपीएल आणि कोणत्याही विशेष आर्थिक क्षेत्राच्या (सेझ) मानीव वितरण परवानाधारकासाठी पहिलाच वीज दराचा आदेश आहे.

आयोगाने वर्गवारी-निहाय वीज दर अशा रीतीने निश्चित केला की सुधारित वीज दरातून संपूर्ण महसुली तूट वसूल करता येईल. आयोगाने, वीज दर धोरणात विनिर्दिष्ट केल्यानुसार, सर्व वर्गवारींसाठी (लघु-दाब २ (बी) व्यतिरिक्त) देखील सरासरी वीज पुरवठा खर्चाच्या +२० टक्क्यांमध्ये वीज दर निश्चित केला. लघु-दाब २ (बी) करिता, उच्च वीज दर आणि वीज दराच्या वर्गवारींच्या सुसूत्रीकरणामुळे, आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या विद्यमान वीज दरामध्ये या आधीच्या सरासरी वीज खर्चाच्या संबंधात क्रॉस-सबसिडी २२१ टक्के होती जी आर्थिक वर्ष २०१६-१७ आणि पुढील ३ वर्षांसाठी सुधारित वीज दरात १३० टक्क्यापर्यंत कमी करण्यात आली आहे.

## परवाना मंजुरी

**विद्युत अपील न्यायाधिकरणाच्या निर्णयाच्या अनुषंगाने महावितरण कंपनीने मुळा प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी लिमिटेडला देय असलेले आकार निश्चित करण्यासाठी याचिका. (सन २०१२ च्या प्रकरण क्र. २४)**

सन १९७१ मध्ये, मुळा प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी लि. (मुळा प्रवरा सोसायटी)ला अहमदनगर जिल्ह्यामधील ५ तालुक्यातील (श्रीरामपूर, राहुरी, नेवासा, संगमनेर आणि राहता) १८३ गावांमध्ये वीज वितरण करण्यासाठी जानेवारी २०११ पर्यंत वैध असलेला परवाना देण्यात आला होता.

दिनांक २७ जानेवारी २०११ च्या आदेशानुसार, आयोगाने मुळा प्रवरा सोसायटीच्या पुरवठ्याच्या क्षेत्रात वितरणाच्या परवान्यासाठी मुळा प्रवरा सोसायटी आणि महावितरण यांच्याकडून आलेल्या अर्जावर निर्णय घेतले. मुळा प्रवरा सोसायटीचा अर्ज नाकारण्यात आला आणि त्यांचे वितरण जाळे आणि संबंधित यंत्रसामुग्री इ. महावितरण कंपनीकडे सुपूर्द करण्याचे निर्देश देण्यात आले. आयोगाने असाही निर्णय दिला की, महावितरण कंपनीला सुपूर्द करण्यात आलेल्या मत्तांचे हस्तांतरण मूल्य ठरविण्यासाठी मुळा प्रवरा सोसायटी एका वेगळ्या याचिकेच्या माध्यमातून दावा करु शकते.

वरील आदेशास आव्हान देणारे मुळा प्रवरा सोसायटीचे अपील, विद्युत अपिलीय न्यायाधिकरणाने सदर प्रकरण पुन्हा आयोगाकडे पाठविले आणि निर्देश दिले की, या प्रकरणाचा निर्णय आयोगाकडून होईपर्यंत, महावितरण कंपनी या परिसरातील वीज पुरवठा, मुळा प्रवरा सोसायटीची वितरण मत्ता वापरून, आयोगाने ठरविलेल्या शुल्कानुसार मुळा प्रवरा सोसायटीला रक्कम अदा करण्याच्या अधीन राहून, चालू ठेवू शकते.

दिनांक १५ ऑक्टोबर २०१२ च्या आदेशानुसार, आयोगाने प्रत्येक महिन्यास रु.१ कोटीची अंतरिम रक्कम मंजूर केली आणि महावितरण कंपनीला मुळा प्रवरा सोसायटीच्या मत्तेचे मूल्यांकन करण्याचे निदेश दिले. त्यानंतर आयोगाने मुळा प्रवरा सोसायटीला त्यांच्या मत्ता रजिस्टरची एक प्रत महावितरणला सादर करण्याचे निर्देश दिले, जेणेकरून महावितरण कंपनीला, आयोगाने मत्तेच्या आकारांचे निश्चितीकरण करण्यासाठी, त्यांचा मूल्यांकन अहवाल सादर करणे शक्य होईल. या आदेशाला विद्युत अपील न्यायाधिकरणापुढे आव्हान देण्यात आले. विद्युत अपील न्यायाधिकरणाने मुळा प्रवरा सोसायटीला त्यांच्या मत्ता रजिस्टर्सची एक प्रत आयोगाकडे सादर करण्याचे निर्देश दिले आणि मालमत्तेचे मूल्यांकन करण्यासाठी एक स्वतंत्र एजन्सी नेमण्याचे आणि मत्तेचा उपयोग करण्यासाठी मुळा प्रवरा सोसायटीला देय शुल्काचे निर्धारण करण्याचे निर्देश आयोगाला दिले.

बाह्य सल्लागार कंपनीने दिलेला अहवाल आणि प्रत्यक्ष पडताळणी विचारात घेऊन आयोगाने मालमत्तेचे मूल्यांकन निश्चित करण्यासाठी प्रतिस्थापना खर्च पद्धत वापरली, प्रतिस्थापना खर्च मत्तेच्या उर्वरित कालावधीसाठी समायोजित केला. सदर मूल्यांकन रु. ३३५.७७ कोटी इतके करण्यात आले. भांडवली खर्च आणि मत्तांचे उपयोगिता कालावधीतील मूल्य यांची मुळा प्रवरा सोसायटीला भरपाई करण्यासाठी मासिक शुल्क निर्धारित करण्यात आले. मुळा प्रवरा सोसायटी आणि महावितरण कंपनीला त्यांच्या अभिप्रायांसाठी हा अहवाल पाठविण्यात आला.

आयोगाने दि. २ मे २०१६ च्या आपल्या आदेशात, मुळा प्रवरा सोसायटीला देय मासिक आकार निश्चित केले. महावितरण कंपनीला खालील निर्देश दिले:

१. फेब्रुवारी २०११ (जेव्हा महावितरणने मुळा प्रवरा सोसायटीच्या मत्ता वापरून आपला पुरवठा सुरु केला) ते एप्रिल २०१६ पर्यंत देय असलेल्या आकारांकरिता १० मे २०१६ रोजी एकूण देय रक्कम रु. ३६०.१९ कोटी एवढी आहे ज्यामध्ये संचित उपयोगकर्ता आकार आणि व्याज याचा समावेश आहे.
२. ही रक्कम महावितरण कंपनीने जून २०१६ पासून सुरू होणाया जास्तीत जास्त ३ मासिक हप्त्यात द्यावयाची आहे.
३. मे २०१६ पासून पुढील मासिक उपयोगकर्ता आकार महावितरण कंपनीने या आदेशात दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक महिन्यात द्यावयाचे आहेत.

महावितरण कंपनीने आयोगाकडे एस्क्रो खात्यात ठेवलेला निधी आयोगाच्या कार्यालयाने मुळा प्रवरा सोसायटीला १० मे २०१६ पर्यंत देण्याचे आदेश देखील आयोगाने आपल्या कार्यालयाला दिले.

### टीपीसी-वितरणची त्यांच्या परवान्याच्या क्षेत्राबाहेरील सहा उपभोक्त्यांना वीज पुरवठा करणे चालू ठेवण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी याचिका (सन २०१५ चे प्रकरण क्र. ४३)

दिनांक १४ ऑगस्ट २०१४ च्या आपल्या आदेशाद्वारे आयोगाने, टिपीसी-वितरणला मुंबई शहर आणि उपनगरातील काही भाग आणि मीरा भाईंदर नगरपालिकेच्या क्षेत्रात (चेने आणि वर्सोवा या गावांच्या अंतर्गत येणाया क्षेत्रासह) वीज पुरवठा करण्यासाठी नवीन वितरण परवाना मंजूर केला. टीपीसी-वितरणने महावितरण कंपनीच्या परवाना क्षेत्रात असलेल्या परंतु ऐतिहासिक कारणांमुळे जे त्यांचे यापूर्वी ग्राहक होते अशा ६ ग्राहकांना वीज पुरवठा चालू ठेवण्याचा प्रस्ताव दिला होता. वितरण परवाना मंजूर करताना, त्यांना असे निदेश दिले गेले की या ६ ग्राहकांशी आणि महावितरण कंपनीशी चर्चा करून त्यांना वीज पुरवठा चालू ठेवावा की नाही यासाठी ६ महिन्यांच्या आत योग्य आदेशासाठी त्यांनी आयोगाशी संपर्क साधावा.

आयोगाने दि. १० मे २०१६ च्या आपल्या आदेशाद्वारे, महावितरण कंपनीची तयारी नसल्याची बाब विचारात घेऊन टीपीसी-वितरणला त्यांच्या ग्राहकांना पुरवठा चालू ठेवण्याची परवानगी दिली, याचप्रमाणे या ग्राहकांना अगदी सुरुवातीपासूनच टीपीसी-वितरणकडून वीज पुरवठा करण्यात येत असल्यामुळे आणि ते ग्राहक महावितरणच्या वितरण व्यवस्थेशी कधीही जोडले गेलेले नसल्याने, आयोगाने महावितरण कंपनीचा क्रॉस सबसिडी अधिभाराचा दावा फेटाळून लावला.

**राज्यांतर्गत वीज व्यापार परवान्यांच्या अटींचा वीज व्यापार परवानाधारकांकडून करण्यात आलेल्या पूर्ततेचा आयोगाने घेतलेला आढावा (२०१५ चे प्रकरण क्र. ८९)**

आयोगाने महाराष्ट्र राज्यातील राज्यांतर्गत विजेच्या व्यापारासाठी ५ वीज व्यापार परवानाधारकांना म्हणजेच मे. इंडियाबुल्स पॉवर जनरेशन, मे. एनटीएस पॉवर, मे. नॉलेज इन्फ्रास्ट्रक्चर सिस्टम प्रा. लि., मे. ट्वेंटीफर्स्ट सेंच्युरी इन्फ्रास्ट्रक्चर (इंडिया) प्रा. लि. आणि मे. डी. एम. कॉर्पोरेशन प्रा. लि. यांना परवाने दिले होते.

वीज व्यापार परवानाधारकांनी विजेचा व्यापार करीत नसल्याचे आणि त्यांच्या परवान्याच्या अटींचे पालन न केल्याचे दिसून आल्यामुळे, आयोगाने त्यांच्याविरुध्द कारवाई सुरू केली

इंडियाबुल्स पॉवर जनरेशन लि.ने व्यापार करणे व्यवहार्य नसल्याने आपला वीज व्यापार परवाना परत घेण्याची विनंती केली. मे. डी. एम. कॉर्पोरेशनकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. अन्य तीन परवानाधारकांनी सांगितले की, परवाना मंजूर झाल्यापासून आतापर्यंत त्यांनी कोणताच व्यापारी व्यवहार केलेला नाही, परंतु भविष्यात लवकरच व्यापार व्यवसाय चालू करण्यात येईल. तसेच बाजारातील परिस्थिती आणि मुक्त प्रवेशाच्या संबंधातील पूर्वीच्या विनियमांमुळे वीज व्यापार सुरु करता आला नाही, असे कारण दिले.

मे. इंडियाबुल्स पॉवर जनरेशन लि. यांनी केलेल्या विनंतीनुसार आयोगाने आपल्या ८ फेब्रुवारी २०१७ च्या आदेशाने त्यांचा वीज व्यापार परवाना रद्द केला. आयोगाने, अन्य परवानाधारकांवर विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १९(३) अंतर्गत त्यांचे परवाने रद्द का करण्यात येऊ नयेत, याबाबत कारणे दाखविण्याची नोटीस बजावली.

**माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रा. लि.ची (पूर्वीची सिरीन प्रॉपर्टीज प्रा.लि.) नावात बदल झाल्यामुळे त्यांच्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका (२०१५ चे प्रकरण क्र.१५२)**

मे. सिरीन प्रॉपर्टीज प्रा. लि. हे त्यांच्या प्लॉट नं. ३, कळवा, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, तालुका ठाणे,जिल्हा ठाणे, महाराष्ट्र, येथील माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा-विषयक विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (सेझ) एक विकासक आहेत. विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १४ (बी) च्या परंतुकानुसार, मे. सिरीन प्रॉपर्टीज प्रा. लि. हे त्यांच्या सेझ क्षेत्रात मानीव वितरण परवानाधारक आहेत. आयोगाने २०१३ मध्ये मे. सिरीन प्रॉपर्टीज प्रा. लि.ला (एसपीपीएल) लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटीं विनिर्दिष्ट करणारे विनियम अधिसूचित केले. २३ नोव्हेंबर २०१५ रोजी, एसपीपीएलचे नाव माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रा. लि. असे बदलण्यात आले आणि त्यानुसार परवान्याच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी याचिका दाखल केली.

त्यांच्या नावात बदल झाल्यानंतर व्यवस्थापनाचे नियंत्रण किवा मालकीचे स्वरुप यामध्ये कोणताही बदल झाला नव्हता; किवा अशा नावाच्या बदलाशिवाय त्यांच्या वितरण परवान्याच्या शर्ती आणि अटी यामध्ये अन्य कोणताही महत्वाचा बदल करुन मागण्यात आला नव्हता. २३ नोव्हेंबर २०१५ रोजी संस्थेला एक नवीन विधी संस्थापन प्रमाणपत्र कंपनी रजिस्ट्रारकडून देण्यात आले आणि भारत सरकारच्या वाणिज्यिक व उद्योग मंत्रालयाने देखील दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी त्यांच्या नावातील बदलास मंजुरी दिली होती.

त्यानुसार, दि.१६ मे २०१६ च्या आदेशाद्वारे, आयोगाने नावातील बदल तत्वतः स्वीकारला आणि नमूद केले की त्यांच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा स्वतंत्रपणे करण्यात येईल.

**गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि.(जीईपीएल)च्या वितरण परवाना क्षेत्रातील बदलामुळे त्यांच्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका (सन २०१६चे प्रकरण क्र. ६४)**

गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. (जीईपीएल) हे प्लॉट क्र. आयटी-५, ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली आणि दिघे गाव, ठाणे, महाराष्ट्र येथे एक माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा-विषयक विशेष आर्थिक क्षेत्राचे (सेझ) विकासक आहेत आणि विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १४ (बी) नुसार, मानीव वितरण परवानाधारक आहेत.

आयोगाने डिसेंबर २०१५ मध्ये जीईपीएलला त्यांच्या ११.७४ हेक्टर क्षेत्रात विजेचा पुरवठा करण्यासाठी त्यांना प्राधिकृत करणाऱ्या व लागू असणाऱ्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी अधिसूचित केल्या. तथापि, दिनांक १८ फ़ेब्रुवारी २०१५ च्या अधिसूचनेद्वारे, वाणिज्यिक मंत्रालयाने सेझच्या नमूद केलेल्या क्षेत्रात १२.९१ हेक्टर्स अशी सुधारणा केली. त्यामुळे जीईपीएलने त्यानुसार वितरण परवान्याच्या विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका दाखल केली.

याशिवाय त्यांच्या वितरण परवान्याच्या अटी व शर्तींमध्ये अन्य कोणताही महत्वाचा बदल नसल्याने, आयोगाने दि. ६ डिसेंबर २०१६ च्या आदेशाद्वारे, क्षेत्रातील बदल स्वीकारला आणि नमूद केले की विशिष्ट अटींमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल.

**निदार युटिलिटीज पनवेल एलएलपी (एनयुपीएलएलपी)ची त्यांचा मानीव वितरण परवानाधारकाचा दर्जा पटलावर घेण्यासाठी आणि त्यांच्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी विनिर्दिष्ट करण्यासाठी याचिका (२०१६ चे प्रकरण क्र. १२८)**

भारत सरकारच्या वाणिज्यिक व उद्योग मंत्रालयाकडून रायगडमधील पनवेल जिल्ह्यात एका बहुविध सेवाविषयक विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) २००९ मध्ये अधिसूचित करण्यात आले. या सेझचे विकासक सनी विस्टा रियल्टर्स प्रा. लि.(एसव्हीआरपीएल) हे होते आणि इक्झोरा कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि.(आयसीपीएल) हे सह-विकासक होते. आयोगाने, इक्सोरा कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि. (आयसीपीएल) यांना मानीव वितरण परवानाधारक म्हणून मान्यता दिली आणि त्यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी १० एप्रिल २०१४ रोजी निर्गमित केल्या.

यानंतर हा सेझ नव्या विकासकाने म्हणजेच पेरसीपिना डेव्हलपर्स प्रा. लि. (पीडीपीएल) यांनी ताब्यात घेतला आणि त्यास वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालयाने जुलै २०१५ मध्ये मंजुरी दिली. त्यानंतर, वाणिज्यिक मंत्रालयाने ९ सप्टेंबर २०१६ रोजी वरील सेझसाठी आयसीपीएल ऐवजी निदार युटिलिटीज पनवेल एलएलपी (एनयुपीएलएलपी) यांना सह-विकासक म्हणून मंजूरी दिली.

निदार युटिलिटीज पनवेल एलएलपी (एनयुपीएलएलपी) यांनी सेझचे सह-विकासक म्हणून मानीव वितरण परवानाधारक या दर्जाची पटलावर नोंद घेण्यासाठी आणि त्यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी मागण्यासाठी याचिका दाखल केली. आयोगाने १० फेब्रुवारी २०१७ च्या आदेशानुसार, आयसीपीएलला निर्गमित केलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटींचे विनियम रद्द केले आणि एनयुपीएलएलपीचा सेझचा मानीव वितरण परवानाधारक म्हणून दर्जा कायम केला. सेझच्या पायाभूत सुविधांचा विकास प्रगतीच्या मार्गावर असताना निदर युटिलिटीज पनवेल एलएलपी (एनयुपीएलएलपी) यानी त्यांना तात्पुरता वीज दर मंजूर करून मिळावा यासाठी याचिका दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले. निदार युटिलिटीज पनवेल एलएलपी (एनयुपीएलएलपी) यांना लागू असलेल्या परवान्याच्या विशिष्ट अटी विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करण्याची प्रक्रिया आयोग स्वतंत्रपणे सुरू करील.

## वीज खरेदी

**महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि.ची वीज खरेदी करारास मान्यतेसाठी आणि मार्च ते ऑगस्ट २०१७ या कालावधीत ३ ते ७ मेगावॅट अल्प-कालीन वीज खरेदी करण्यासाठी वीज दर स्वीकारण्याकरिता याचिका (सन २०१७ चे प्रकरण क्र. ३१)**

महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कंपनी लि. (एमएडीसी), ही नागपूर मिहान सेझ येथे मल्टी मॉडल इंटरनॅशनल कार्गो हब आणि विमानतळ विकसित करणारा एक मानीव वितरण परवानाधारक असून त्यांनी महावितरण कंपनीबरोबर रात्रंदिवस ३ मेगावॅट विजेचा पुरवठा आणि दिवसभरात अन्य ६ काल-गटात १ ते ४ मेगावॅट अतिरिक्त विजेच्या पुरवठ्यासाठी केलेल्या वीज खरेदी करारास मान्यता मागितली. भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'एमएडीसी'ने निर्गमित केलेल्या स्पर्धात्मक बोली प्रक्रियेत ७ संस्थांनी भाग घेतला. महावितरण कंपनीची सर्व काल-गटात सर्वात कमी बोली होती.

आयोगाने आपल्या २८ फेब्रुवारी, २०१७ च्या आदेशात, मार्च ते ऑगस्ट २०१७ या करार कालावधीकरिता 'एमएडीसी'आणि महावितरण कंपनी यांच्यात झालेल्या वीज खरेदी करारास मान्यता दिली आणि सर्व-कालगटासाठी विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६३ नुसार स्पर्धात्मक बोलीच्या माध्यमातून मिळालेला रु. ३.३३ प्रति युनिट हा सर्वात कमी वीज दर म्हणून स्वीकारला.

**गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. (जीइपीएल) यांची वीज खरेदी करारास मान्यतेसाठी आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये ४ मेगावॅट वीज खरेदीकरिता वीज दर स्वीकारण्यासाठी याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. ३६)**

'जीइपीएल', एक सेझ विकासक आणि मानीव वितरण परवानाधारक असून, त्यांनी ग्लोबल एनर्जी प्रा. लि. (आंतर-राज्य वीज व्यापार परवानाधारक) यांच्याबरोबर आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये रात्रंदिवस २ मेगावॅट आणि दिवसाच्या अन्य काल-गटासाठी अतिरिक्त २ मेगावॅट विजेची खरेदी करण्यासाठी केलेल्या वीज खरेदी करारास (आणि पूरकपत्र) मंजुरी मागितली. स्पर्धात्मक बोली प्रक्रियेत चार संस्थांनी भाग घेतला. त्यापैकी केवळ दोन बोली विचारात घेण्यासाठी शिल्लक राहिले. सर्वात कमी बोलीदार म्हणून उरलेल्या ग्लोबल एनर्जीची निवड करण्यात आली.

भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार स्पर्धात्मक बोली प्रक्रियेची कार्यवाही करण्यात आली. त्यानुसार आयोगाने वीज खरेदी करारास मान्यता दिली आणि स्पर्धात्मक बोलीच्या माध्यमातून मिळालेला प्रति युनिट रु. ३.७३ हा वीज दर स्वीकारण्यात आला.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ने निर्धारित नुकसानी लावल्याबद्दल रत्तन इंडिया पॉवर लि. ची याचिका (सन २०१५ चा ५४)**

रत्तन इंडिया पॉवर लि. (आरपीएल)ने, स्पर्धात्मक बोली प्रक्रियेनंतर, अमरावती जिल्ह्यातील नंदगावपेठ येथील त्यांच्या वीज प्रकल्पातून विजेचा पुरवठा करण्यासाठी महावितरण कंपनीशी वीज खरेदी करार (पीपीए) केला आहे. आरपीएलने, विजेचा पुरवठा करण्यास झालेल्या विलंबासाठी निर्धारित नुकसानीची मागणी करणारी महावितरण कंपनीची दि. ७ मे, २०१५ रोजीची नोटीस रद्द करण्यासाठी, याचिका दाखल केली. तथापि, विजेच्या निष्कासन व्यवस्थेमध्ये देखील प्रश्न असल्याचे विचारात घेऊन आयोगाने महावितरण कंपनीची नोटीस रद्द केली आणि वीज खरेदी करारांतर्गत सुधारित पोचवणी दिनांकास परवानगी दिली.

**महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एमएडीसी)ची अल्प-कालीन वीज खरेदी योजनेस मान्यता मिळण्याकरीता याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. १००)**

'एमएसडीसी'ने स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून अल्प-कालीन वीज खरेदी करण्याची आपली योजना मंजुरीसाठी सादर केली. 'एमएडीसी'ने दररोज रात्रंदिवस बेस लोडनुसार ३ मेगावॅट ते कमाल दिवसाच्या वेगवेगळ्या वेळेस जास्तीत जास्त ७ मेगावॅटपर्यंत बदलत राहणारा वीज पुरवठा करावा लागण्याचा अंदाज केला.

आयोगाने आपल्या २३ डिसेंबर २०१६ च्या आदेशात दिवसाच्या ६ अन्य काल-गटासाठी निर्धारित केलेल्या विजेच्या आवश्यकतेस मान्यता दिली. विजेच्या मागणीमध्ये झालेल्या कोणत्याही अनपेक्षित वाढीची पूर्तता करण्यासाठी पॉवर एक्स्चेंजमधून अतिरिक्त वीज खरेदी करण्यास देखील आयोगाने 'एमएसडीसी'ला परवानगी दिली.

**माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रा. लि. यांची स्पर्धात्मक बोलीच्या माध्यमातून १० मेगावॅटच्या बेस लोडसाठी मध्यम-कालीन वीज खरेदी करण्याकरिता वीज दर स्वीकारण्यासाठी आणि वीज खरेदी करारास मान्यता देण्यासाठी याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. ११५ आणि ११६)**

सन २०१६ च्या प्रकरण क्र. ११५ मध्ये, माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रा. लि. ने, त्यांनी जिन्दाल पॉवर लि. यांच्या बरोबर १० जून, २०१६ रोजी केलेल्या वीज खरेदी करारास आणि भारत सरकारच्या वीज खरेदीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून १० मेगावॅट बेस लोडची ५ वर्षे वीज खरेदी करण्यासाठी निश्चित केलेला रु ३.८२ प्रति युनिट वीज दर स्वीकारण्यास, मान्यता मागितली. अवलंबिण्यात आलेली प्रक्रिया आणि प्राप्त झालेल्या बोली विचारात घेऊन, आयोगाने, १ जुलै, २०१६ ते ३० जून, २०२१ पर्यंतच्या पाच वर्षांच्या कालावधीसाठी केलेल्या वीज खरेदी करारास आणि विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ६३ अंतर्गत वीज दर स्वीकारण्यास, मान्यता दिली.

त्याचप्रमाणे, सन २०१६ च्या प्रकरण क्र. ११६ मध्ये, माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रा. लि. ने त्यांनी मे. जीएमआर एनर्जी ट्रेडींग लि. यांच्याबरोबर २१ जून, २०१६ रोजी केलेल्या वीज खरेदी करारास आणि स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या माध्यमातून पाच वर्षांच्या कालावधीकरिता १० मेगावॅट सर्वोच्च मागणीच्या वीज पुरवठ्यासाठी वीज खरेदी करण्यासाठी निश्चित केलेला रु ४.४० प्रति युनिट वीज दर स्वीकारण्यास, मान्यता मागितली.

माईंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रा. लि.ने अवलंबिलेली स्पर्धात्मक बोली प्रक्रिया आणि वीज खरेदी करारातील अटी या वीज खरेदीच्या भारत सरकारच्या मार्गदर्शक सुचनांनुसार असल्यामुळे, आयोगाने वीज खरेदी करारास मान्यता दिली आणि प्रस्तावित केल्याप्रमाणे ५ वर्षाच्या कालावधीसाठी स्पर्धात्मक बोलीच्या माध्यमातून मिळालेला वीज दर स्वीकारला.

## नूतनशील ऊर्जा

**महा को-जनरेशन ग्रीन पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन यांची मविनिआ (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणासाठी अटी व शर्ती) विनियम, २०१५ मधील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यासाठी याचिका (सन २०१६ चे प्रकरण क्र. २९)**

आयोगाच्या सन २०१० आणि सन २०१५ च्या दोन्हीं नूतनशील ऊर्जा दराच्या विनियमांमध्ये अशी तरतूद आहे की, अधिमान्य वीज दरासाठी पात्र होण्याकरिता अ-खनिज इंधनावर (बगास सह) आधारित सह-निर्मिती प्रकल्प आणि बायोमासवर आधारित विद्युत प्रकल्प यांनी करावयाचा खनिज इंधनाचा वापर १५ टक्क्यांपेक्षा जास्त नसावा. तथापि, चालू नूतनशील ऊर्जा दराच्या विनियम २०१५ मधील विनियम ४६.२ च्या परंतुकासह विनियम ६४ मध्ये अशी तरतूद आहे की, ज्या कालावधीमध्ये इंधन वापराच्या या निकषाची पूर्तता होऊ शकत नसेल अशा कालावधीमध्ये अधिमान्य वीज दराच्या ऐवजी कमी सरासरी वीज खरेदी खर्चाचा (एपीपीसी) दर लागू राहील. महा को-जनरेशन ग्रीन पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशनने एपीपीसी दराऐवजी पूर्वीच्या नूतनशील ऊर्जा दराच्या विनियम २०१० मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आधिमान्य वीज दरात प्रति युनिट ५० पैसे कपात करण्याचा दंड पुनर्स्थापित करण्यासाठीच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्याची मागणी केली होती.

आयोगाने आपल्या १६ ऑगस्ट, २०१६ च्या आदेशामध्ये, पूर्वीची इंधन वापरासंबंधीची कसुरासाठीची तरतूद पुनर्स्थापित करण्यासाठी, नूतनशील ऊर्जा दराच्या विनियम २०१५ मध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे मान्य केले आणि त्यानुसार विनियमांमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु करणार असल्याचे नमूद केले.

**हिंदुस्थान झिंक लि. यांची महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ने विलंब भरणा अधिभार परत न केल्याबाबत याचिका (सन २०१५ चे प्रकरण क्र. १५०)**

हिंदुस्थान झिंक लि.ने ऊर्जा खरेदी करारांतर्गत पवन ऊर्जेच्या पुरवठ्यासाठीचे प्रदान देण्यात महावितरण कंपनीला झालेल्या उशीरामुळे विलंब भरणा अधिभार न देण्यासंबंधात आयोगासमोर याचिका दाखल केली. आयोगाने १० ऑगस्ट २०१६ च्या आदेशान्वये महावितरण कंपनीला निर्देश दिले की, त्यांनी ऊर्जा खरेदी करारांतर्गत देय असलेला विलंब भरणा अधिभार ३० दिवसांच्या आत अदा करावा आणि त्यानंतर अदा करावयाच्या कोणत्याही शिल्लक अधिभाराच्या रकमेवर प्रति महिना १.२५ टक्के दराने व्याज देय राहील.

**कोल्हापूर येथील ग्रीन इनर्जी प्रा. लि. (केजीइपीएल), यांची त्यांच्या कोल्हापूर येथील १.८ मेगावॅट नगरपालिका घन-कचऱ्यावर आधारित विद्युत प्रकल्पामधून महाराष्ट्रातील वितरण परवानाधारकांना पुरवठा करावयाच्या विजेसाठी वीज दर निश्चित करण्याकरिता याचिका (सन २०१५ चे प्रकरण क्र. ८७)**

आयोगाने १० ऑक्टोबर २०१६ च्या आदेशान्वये, 'केजीइपीएल'च्या कोल्हापूर येथील घनकचऱ्यावर आधारित नगरपालिका विद्युत प्रकल्पाकरिता २० वर्षांच्या कालावधीसाठी प्रकल्प–विशिष्ट रु.५.४९ प्रति युनिटचा वीज दर निश्चित केला.

त्याचप्रमाणे, काही पवन ऊर्जा निर्मात्यांना त्यांनी पुरविलेल्या विजेसाठी दीर्घकाळ प्रदान न केल्याने आणि /किंवा उशीरा प्रदान केल्याने तसेच विलंब भरणा अधिभार आणि तत्संबंधीत प्रश्नांसंदर्भातील सन २०१६ च्या प्रकरण क्र. ५३, ६२, ६८, ७४, ७५, ७९, १३५, १३६ आणि १४४ च्या संबंधात, आयोगाने दि. १६ मार्च २०१७ रोजी केलेल्या आदेशात महावितरण कंपनीला मुद्दलाची रक्कम ताबडतोब देण्याचे निर्देश दिले. तसेच आयोगाने हिंदुस्थान झिंक लि.च्या संबंधातील सन २०१५ च्या प्रकरण क्र. १५० मधील आपल्या आदेशाच्या धर्तीवर विलंब भरणा अधिभारासंबंधात निर्देश दिले.

## मुक्त प्रवेश

**सन २०१३ च्या प्रकरण क्र. ८, १८ आणि २० मधील सौर उर्जेसाठी मुक्त प्रवेश आणि खरेदी याबाबत संबंधित आदेशाचे पालन न केल्याबाबत ग्रीन एनर्जी असोसिएशनची याचिका (२०१५ चे प्रकरण क्र.१३९)**

आयोगाने आपल्या दिनांक १७ मार्च २०१७ च्या आदेशात, महावितरणच्या सभासदांनी सरासरी उर्जा खरेदी खर्चाच्या (एपीपीसी) दराने आणि/किंवा आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या अधिमान्य दराने सौर उर्जा खरेदी करावी, असे निर्देश महावितरणला देण्याची याचिकाकर्त्याची विनंती स्वीकारली नाही. याचे कारण असे की, वास्तविक परिस्थिती विचारात घेता, महावितरणला विजेची विक्री करण्या व्यतिरिक्त, नूतनशील उर्जा निर्मात्यांना अनेक पर्याय उपलब्ध असून त्यांनी त्यांचा शोध घेणे अपेक्षित आहे. जसे की, त्रयस्थ व्यक्ती/संस्थांना विक्री किंवा पॉवर एक्स्चेंजमार्फत विजेची विक्री करणे. तसेच, ग्राहकांनी त्यांच्या ठिकाणी विशेष ऊर्जा मीटर्स बसविले नसले तरी मुक्त प्रवेशासाठी परवानगी देण्यात यावी आणि निर्माण केलेल्या पवन ऊर्जेसाठी क्रेडिट नोट्स निर्गमित करण्यात याव्यात, ही विनंती देखील आयोगाने स्वीकारली नाही.

**सन-अँड-सॅन्ड हॉटेल्स प्रा.लि.ची मुक्त प्रवेशाच्या परवानगीची तारीख, शेड्युलिंग शुल्क आणि वीज निर्मितीसाठी क्रेडिट नोट्स निर्गमित करण्याबद्दलची याचिका (२०१४ चे प्रकरण क्र.१९७)**

आयोगाने आपल्या दिनांक १२ जानेवारी २०१७ च्या आदेशात महावितरणला निर्देश दिले की त्यांनी सन-अँड-सॅन्ड हॉटेलला एप्रिल आणि मे, २०१४ मध्ये पुरवठा करण्यासाठी पवन ऊर्जा निर्मात्यांनी अंतःक्षेपण केलेल्या युनिटसाठी निर्मिती क्रेडिट नोट्स (जीसीएन) निर्गमित कराव्यात. आयोगाने महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राला निर्देश दिले की त्यांनी वीज निर्मितीच्या क्रेडिट नोट्स या महिन्यांच्या देयकांमध्ये आरइन्फ्रा-वितरणला (ज्यांच्या क्षेत्रात ग्राहक स्थित असेल) पाठवाव्यात आणि आरइन्फ्रा-वितरणने त्यांच्या वापराशी संबंधित देयक चक्रामध्ये सन-अँड-सॅन्ड हॉटेलला तत्सम क्रेडिट्स एक महिन्याच्या आत द्यावेत.

**जेसन्स फाउंड्री प्रा.लि.ची महावितरण कंपनीने त्यांना अल्प-कालीन मुक्त प्रवेशास नकार दिल्याबाबतची याचिका (२०१६ चे प्रकरण क्र.१२२)**

आयोगाने आपल्या १२ जानेवारी २०१७ च्या आदेशात नमूद केले की महावितरण कंपनीद्वारे याचिकादारांच्या अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठीच्या अर्जांच्या अस्वीकृतीचे एकमेव कारण - म्हणजेच जेएफपीएलला उर्जा खरेदी करार मुदतपूर्व समाप्त करण्याची परवानगी नव्हती- असमर्थनीय आहे, आयोगाने महावितरण कंपनीला निर्देश दिले की, जेएफपीएलने मे २०१६ पासून ग्रिडमध्ये अंतःक्षेपण केलेले युनिट्स त्यांच्या वापराच्या संबंधित देयक चक्रामध्ये, त्यांनी समायोजित करावेत आणि यापुढे जेएफपीएलने अर्ज केल्यास, ते संबंधित विनियमांची अन्यथा पूर्तता करीत असल्यास, त्यांना मुक्त प्रवेश द्यावा.

**ग्लोबल एनर्जी प्रा.लि.ची मुक्त प्रवेश/ना हरकत प्रमाणपत्र देणे, बँकिंग सुविधा आणि निर्मिती क्रेडिट नोट्सचे समायोजन, चुकीचा क्रॉस सबसिडी अधिभार लावणे आणि संबंधित बाबींकरिता याचिका(सन २०१४ चे प्रकरण क्र.१८६)**

आयोगाने आपल्या दिनांक १६ नोव्हेंबर २०१६ च्या आदेशात, टीपीसी-वितरणला या प्रकरणात संबंधित निर्मात्यांनी त्यांच्या सर्व वीज निर्मितीसाठी किवा निर्मितीच्या काही भागासाठी नूतनशील उर्जा प्रमाणपत्रे घेतली असली किंवा नसली तरी देखील, ५ मुक्त प्रवेश ग्राहकांना तसेच अशा अन्य मुक्त प्रवेश ग्राहकांना त्यांनी मिळविलेल्या नूतनशील उर्जेच्या प्रमाणात, आकारलेला १०० % क्रॉस सबसिडी अधिभार आणि लागू असलेला २५ % अधिभार यामधील फरकाची रक्कम (लागू असलेल्या व्याजासह) परत करावी.

**लक्ष्मी ऑर्गेनिक इंडस्ट्रीजची आर्थिक वर्ष २०१४-१५ पासून वहन आकार आणि लागू असणारे तोटे लावणे आणि आर्थिक वर्ष २०१३-१४ मध्ये वीज दरातील तात्पुरती वर्गवारी लागू करण्याबाबतची याचिका (सन २०१५ चे प्रकरण क्र.५९ आणि सन २०१५ चा संकीर्ण अर्ज क्र.८)**

आयोगाने आपल्या दिनांक ३ जून २०१६ च्या आदेशात असा निष्कर्ष काढला की, त्यांच्या स्व-वापरासाठीचा निर्मिती प्रकल्प आणि त्यांचे औद्योगिक संच १ आणि २ यांच्या जाळ्याची व्यवस्था करण्यात असली तरी देखील ते ग्रिडचा एक अविभाज्य भाग होतात आणि त्यामुळे त्यांना वहन आकार आणि लागू असणारे तोटे महावितरणकडून आकारण्यात येतील.

**अरविंद कॉटसिन (इंडिया) लि., आणि अन्य २ यांची मुक्त प्रवेशाचा कालावधी कमी करणे, शिल्लक युनिट्सची खरेदी करणे आणि युनिट क्रेडिटचे फेर-निर्धारण करणे याबाबतची याचिका. (२०१५ चे प्रकरण क्र.१४)**

आयोगाने आपल्या २१ एप्रिल २०१६ च्या आदेशात नमूद केले की, आयोगाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करुन याचिकाकर्त्याने शिल्लक युनिट्सच्या खरेदीस विलंब करणे किंवा ती नाकारण्याचे कोणत्याही प्रकारे समर्थन होऊ शकत नाही. त्यानुसार, महावितरण कंपनीला विद्युत अधिनियम, २००३ च्या क्लम १४२ मधील तरतुदींतर्गत दंड का आकारण्यात येऊ नये, याबाबत २१ दिवसांच्या आत कारणे दाखविण्यासाठी आयोगाकडून नोटीस पाठविण्यात आली.

# ७. विनियम आणि कार्यप्रणाली निर्देश

## ७.१ विनियम

जनतेकडून सूचना/हरकती मागविल्यानंतर विद्यमान विनियमांमधील सुधारणांसह सर्व विनियम, आयोगाने महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत राजपत्रात अधिसूचित केले आहेत. आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये खालील विनियम/ विनियमांमध्ये सुधारणा अधिसूचित केल्या आहेत.

**मविनिआ (शुल्क व आकार) विनियम, २०१७ (६ एप्रिल २०१७ रोजी अधिसूचित)**

या विनियमांनी, पूर्वीचे २००४ चे विनियम अधिक्रमित केले असून त्यामध्ये विद्युत अधिनियम २००३ च्या तरतूदींतर्गत आयोगाकडे करण्यात आलेल्या विविध प्रकारच्या अर्जांसाठी आणि परवान्यांसाठी आयोगाला देय असलेले शुल्क आणि आकार विनिर्दिष्ट करण्यात आले आहेत.

विद्युत क्षेत्राचा विकास आणि आयोगाला कराव्या लागणा-या कामांचे स्वरूप व त्यासाठी लागणा-या निधीची आवश्यकता यांचा विचार करून तसेच त्यामध्ये अधिक स्पष्टता यावी आणि अंमलबजावणी अधिक सुलभ व्हावी यासाठी, आयोगाने या विनियमांद्वारे शुल्क आणि आकार यांचा आढावा घेऊन त्यांचे सुसुत्रीकरण केले. विनियमांमध्ये केलेले महत्वाचे बदल खालीलप्रमाणे आहेत:

एक) वीज व्यापार आणि वितरण परवानाधारकांसाठी वार्षिक परवाना शुल्क हे विजेच्या विक्रीपासून मिळणा-या महसुलाच्या ०.०५ % पासून ०.०२ % पर्यंत कमी करण्यात आले आहे.

दोन) पारेषण परवानाधारकांकरिता वार्षिक परवाना शुल्क, पारेषण क्षमता कराराऐवजी परवानाधारकाच्या व्होल्टेज-निहाय जाळ्यावर आधारित असेल.

तीन) वीज निर्मितीसाठीचा वीज दर निश्चित करण्यासाठीच्या याचिकेचे शुल्क हे, निर्मिती संचाच्या स्थापित क्षमतेवर आधारित अधिकतम रु. २०,००,०००/-च्या अधीन असेल.

चार) बाहेरगावच्या सुनावणीसाठी कोणतेही वेगळे शुल्क आकारण्यात येणार नाही.

पाच) पारंपरिक वीज निर्मितीचे संच आणि परवानाधारकाकरिता वादांच्या अभिनिर्णयासाठीच्या अर्जांकरिता शुल्क रु. ५ लाखावरुन रु. ३ लाख, नूतनशील उर्जा संचांसाठी रु. ५०,०००, स्व-वापरासाठीच्या निर्मिती संचांसाठी रु. २५,००० आणि ग्राहक व ग्राहकांच्या प्रतिनिधींकरिता रु. ५,००० असे सुधारण्यात आले.

**मविनिआ (नूतनशील उर्जेच्या दर निश्चितीकरणासाठी अटी व शर्ती)(पहिली सुधारणा) विनियम २०१७ (४ जानेवारी २०१७ रोजी अधिसूचित)**

आपल्या सन २०१६ च्या प्रकरण क्र. २९ मधील आदेशाच्या अनुषंगाने, आयोगाने नूतनशील उर्जा दर विनियम २०१५ मधील विनियम ४६ च्या परंतुकामध्ये सुधारणा केली ज्यामुळे, ज्या कालावधीकरिता अ-खनिज (उसाच्या चिपाडासह) इंधनावर आधारित सहनिर्मिती आणि बायोमासवर आधारित प्रकल्पांकडून खनिज इंधनाचा वापर १५ टक्क्यांपेक्षा जास्त होईल त्या कालावधीकरिता त्यांनी देय असलेला वीज दर हा (सरासरी वीज खरेदीच्या दराऐवजी) अधिमान्य वीज दरापेक्षा ५० पैशाने कमी असेल. हे यापूर्वीच्या विनियम २०१० ना अनुसरून आहे.

## ७.२ कार्यप्रणाली निर्देश

**चेंजओव्हर केलेल्या ग्राहकांच्या बाबतीत नक्त मापन विनियमांची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यप्रणाली निर्देश (३० सप्टेंबर २०१६)**

ज्या ग्राहकांनी त्यांच्या मूळ परवानाधारकाकडून त्यांच्या क्षेत्रातील अन्य परवानाधारकाकडे स्थलांतरण केलेले आहे आणि ज्यांना त्यांच्या पूर्वीच्या परवानाधारकाच्या (वायर परवानाधारक) वितरण जाळ्यातून आताच्या परवानाधारकाकडून (पुरवठा परवानाधारक) वीज पुरवठा करण्यात येतो, त्यांच्या बाबतीत मविनिआ (छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक (पीव्ही) यंत्रणांकरिता

नक्त मापन) विनियम २०१५ ची अंमलबजावणी करण्यासंबंधात काही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. ही परिस्थिती मुख्यतः मुंबईतच उद्‌भवते.

या कार्यप्रणाली निर्देशांतर्गत असे निर्देश देण्यात आले की, नक्त मापन विनियमांतर्गत पात्र ग्राहकाला जो पुरवठा परवानाधारक वीज पुरवीत असेल तो वायर परवानाधारकांशी तांत्रिक आणि आंतर-जोडणीच्या आवश्यकता, सुरक्षितता, अन्य परवानग्या आणि मंजुया, कराराचा कालावधी आणि समाप्ती, पात्र ग्राहक आणि  पुरवठा परवानाधारक यांच्यामधील आदर्श नक्त मापन करारात अभिप्रेत असलेला प्रवेश आणि जोडणी खंडित करणे, या बाबींसंबंधात समन्वय साधेल.

**मुक्त प्रवेश अर्जाच्या प्रक्रियेशी संबंधित प्रथम कार्यप्रणाली निर्देश (१९ ऑक्टोबर, २०१६ रोजी अधिसूचित)**

वितरण परवानाधारकाने उपस्थित केलेल्या खालील प्रश्नांसंबंधी मुक्त प्रवेश अर्जदारांना सामोरे जाव्या लागणाया खालील अडचणींबाबत आयोगास अनेक निवेदने प्राप्त झाली आहेतः

एक) डे-अहेड मुक्त प्रवेश पॉवर एक्सचेंज मधून वीज घेण्यासाठी

दोन) मुक्त प्रवेश अर्जदारांनी नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाचे पालन करण्याबाबत

तीन) करारांतर्गत मागणीच्या मर्यादेइतका मुक्त प्रवेश मर्यादित ठेवण्याबाबत.

वरील विषयाच्या संदर्भात आयोगाने वितरण आणि पारेषण मुक्त प्रवेश विनियम, २०१६ अंतर्गत खालील कार्यप्रणाली निर्देश निर्गमित केले :

१. *"जर पॉवर एक्स्चेंजसह अन्य कोणत्याही स्त्रोताकडून वीज घेण्याकरिता अल्प-कालीन मुक्त प्रवेशासाठी (एक दिवस आधी केलेल्या अर्जा व्यतिरिक्त) अर्ज करण्यात आला असेल तर, नोडल एजन्सीने, वितरण मुक्त प्रवेश विनियमांच्या विनियम ११.२ आणि पारेषण मुक्त प्रवेश विनियमांच्या विनियम ११.१ मध्ये, जसे असेल तसे, विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे; आणि वितरण मुक्त प्रवेश विनियमांच्या विनियम ११.३ ते ११.६ आणि पारेषण मुक्त प्रवेश विनियमांच्या विनियम ११.२ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचा डे-अहेड मुक्त प्रवेशाकरिता अवलंब करणे आवश्यक आहे. डे-अहेड मुक्त प्रवेश फक्त १ दिवस आधी अर्ज केलेल्या अल्प-कालीन मुक्त प्रवेशाला संदर्भ करतो; आणि  कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या स्त्रोताला किंवा पॉवर एक्स्चेंजच्या विशिष्ट उत्पादनाला संदर्भ करीत नाही.*

२. *जर पॉवर एक्स्चेंजमधून वीज पुरवठा घेण्यासाठी पारेषण किंवा वितरण मुक्त प्रवेश मागण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल तर, महावितरण कंपनी केंद्रीय विद्युत नियामक आयोगाने विहित केलेल्या नमुन्यांनुसार नोडल एधन्सीला परवानग्या उपलब्ध करुन देईल, आणि त्यांची एक प्रत मुक्त प्रवेश अर्जदाराला देखील देईल.*

३. *वितरण मुक्त प्रवेश विनियमांच्या विनियम ४.२ अंतर्गत, करारातर्गंत मागणीचे नियमन विद्युत पुरवठा संहितेमधील आणि कृतीच्या मानकांच्या विनियमांमधील तरतुदींद्वारे करण्यात येईल, आणि त्यात मुक्त प्रवेशाच्या मंजुरीसाठी एक अट म्हणून करारांतर्गंत मागणीमध्ये सुधारणा करण्याची कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे, ग्राहकाने करारांतर्गंत मागणीत वाढ केली नाही किंवा अन्यथा सुधारणा केली नाही, जी करणे अथवा न करण्याचा विकल्प पूर्णपणे त्याला असतो, या कारणास्तव ग्राहकाने मुक्त प्रवेशासाठी केलेला अर्ज नाकारण्यात येणार नाही. तथापि, विनियमांमध्ये अशी तरतूद आहे की, वितरण व्यवस्थेमध्ये आवश्यक पायाभूत सोयी-सुविधा आणि क्षमतेच्या उपलब्धतेची वितरण परवानाधारक पडताळणी करील आणि जर परिणमस्वरुपी निर्माण होणारा विद्युत प्रवाह विद्यमान वितरण व्यवस्थेमध्ये सामावून घेणे शक्य असेल तरच, मध्यम किंवा अल्प-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करील. जर वर मागितलेल्या मर्यादेपर्यंत मुक्त प्रवेश देण्यापूर्वी विद्यमान वितरण आणि मापन यंत्रणेमध्ये वाढ किंवा श्रेणीवाढ करण्याची आवश्यकता असेल तर नोडल एजन्सी तसे अर्जदाराला लेखी विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालमर्यादेत कळवील आणि विद्युत पुरवठा संहिता आणि कृतीच्या मानकांच्या विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचा  अवलंब करील."*

४. *वितरण परवानाधारक/नोडल एजन्सी मुक्त प्रवेश अर्जदाराकडून नूतनशील ऊर्जा खरेदीच्या बंधनाच्या पूर्ततेसंबंधी कोणतीही माहिती मागणार नाही किंवा या कारणास्तव अर्ज नाकारणार नाही."*

**मुक्त प्रवेश अर्जाच्या प्रक्रियेशी संबंधित द्वितीय कार्यप्रणाली निर्देश (८ मार्च, २०१७ रोजी अधिसूचित)**

मुक्त प्रवेश अर्जदारांना सामोरे जाव्या लागणाया खालील अडचणींबाबत आयोगास अनेक निवेदने प्राप्ती झाली आहेतः

१. मागण्यात आलेल्या अल्प-कालीन मुक्त प्रवेशाच्या क्षमतेवर आधारित वहन आणि पारेषण आकार वितरण परवानाधारकाकडून लावण्यात येतात.

२. नूतनशील ऊर्जेच्या बाबतीत देखील, मंजूर करण्यात आलेल्या अल्प-कालीन मुक्त प्रवेशाचा वापर करण्यात आला नाही तरी, परवानाधारकाकडून वहन आकार व पारेषण आकार हे, अल्प-कालीन मुक्त प्रवेश मंजूर करण्यात आलेल्या संपूर्ण कालावधीसाठी वसूल करण्यात येतात.

३. परवानाधारकाकडून ग्राहकांच्या करंट/ पोटेन्शिअल ट्रान्सफॉर्मर (सीटी/पीटी) मापनाच्या क्षमतेपर्यंत अल्प-कालीन मुक्त प्रवेश मर्यादित ठेवण्यात येत आहे.

४. मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठीच्या अर्जांना परवानाधारकाकडून उत्तरे आणि परवानग्या देण्यात येत नाहीत

५. मुक्त प्रवेश अर्जापैकी काही अर्ज ते विहित नमुन्यात न केल्याबद्दल आणि कार्यपध्दतीमधील अशा अन्य उणीवांसाठी नाकारण्यात येतात.

आयोगाने खालीलप्रमाणे कार्यप्रणाली निर्देश निर्गमित केले आहेतः

*१. "अल्प-कालीन मुक्त प्रवेशाचा ग्राहक, निर्मिती केंद्र किंवा परवानाधारक, जो वितरण यंत्रणेचा वापर करीत असेल, वहन आकार किंवा पारेषण आकार, जसे असेल तसे, वापराच्या ठिकाणी प्रत्यक्ष खेचलेल्या ऊर्जेवर 'रुपये प्रति युनिट' या तत्त्वावर, अदा करील. वितरण परवानाधारक या ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा जास्त वसूल झालेली कोणतीही रक्कम, एक महिन्याच्या आत, लागू असलेल्या व्याजासह, अशा परताव्यासाठी अर्ज करण्यात आला नसला तरी, ग्राहकाला परत करील.*

*२. वितरण मुक्त प्रवेश विनियमांमधील विनियम १६.२ आणि २०.१ विचारात घेता, विनियम ११.९ नूतनशील ऊर्जेपासून मिळणाऱ्या विजेला लागू नाही आणि नूतनशील ऊर्जेसाठी मंजूर करण्यात आलेल्या अल्प-कालीन मुक्त प्रवेशाचा वापर झाला नाही तर वहन आणि पारेषण आकार लागू असणार नाहीत. वितरण परवानाधारक या कारणास्तव वसूल झालेली कोणतीही रक्कम एक महिन्याच्या आत लागू असलेल्या व्याजासह, अशा परताव्यासाठी अर्ज करण्यात आला नसला तरी, ग्राहकाला परत करील.*

*३. अल्प-कालीन मुक्त प्रवेश किंवा मध्यम-कालीन मुक्त प्रवेशामध्ये नमूद करण्यात आलेल्या आवश्यकतेप्रमाणे खेचलेल्या विजेचे मापन करण्यास जर विद्यमान मापन व्यवस्था अपुरी नसेल तर सीटी/पीटी मध्ये वाढ करण्याची गरज नसेल.*

*४. वितरण मुक्त प्रवेश विनियमांमधील विनियम १०.५ नुसार, वितरण परवानाधारकाने मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत त्याचा निर्णय ६० दिवसाच्या आत, नाकारला असल्यास कारणासह, कळविणे आवश्यक आहे. वितरण परवानाधारक, जे अर्ज ठरवून देण्यात आलेल्या काल-मर्यादेनंतर सध्या निर्णयासाठी किंवा उत्तरासाठी प्रलंबित आहेत अशा सर्व अर्जावर आपला निर्णय पुढील १५ दिवसात, अर्ज नाकारला असल्यास कारणांसह, कळवील. वितरण परवानाधारकांने मध्यम-कालीन मुक्त प्रवेशासाठी प्राप्त झालेल्या अर्जांना विनियमांत ठरवून दिल्याप्रमाणे एप्रिल २०१६ पासून उत्तरे न पाठविण्याबाबतच्या अभिवेदनासंबंधी आणि असे अर्ज ३ महिने अगोदर करावयाचे असतात हे विचारात घेता, वितरण परवानाधारक अशा अर्जावर निर्णय घेण्यात किंवा घेतलेला निर्णय कळविण्यामुळे अशा विलंबापासून उदभवणाऱ्या परिणामांना जबाबदार राहील.*

*५. जेव्हा नोडल एजन्सीला पारेषण किंवा वितरण मुक्त प्रवेशाकरिता अर्ज करण्यात येईल तेव्हा, नोडल एजन्सी अर्जदाराला त्याच्या अर्जातील कोणतीही प्राथमिक किंवा कार्यपध्दतीमधील उणीव (जसे की विहित नमुन्यात अर्ज न करणे, आणि अशा अन्य संकीर्ण उणीवा) तीन कामाच्या दिवसाच्या आत अर्जदाराला कळवील ज्यामुळे उणीवा दूर करण्यासाठी अर्जदाराला आवश्यक वेळ मिळेल."*

# ८. ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२ (५) व (६) तसेच आयोगाचे विद्युत लोकपाल आणि ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच (सीजीआरएफ) विनियम, २००६ (ज्या विनियमांनी विद्युत अधिनियम, २००३ अंमलात आल्यानंतर थोड्याच दिवसांनी अधिसूचित करण्यात आलेल्या पहिल्या विनियमांना अधिक्रमित केले आहे) च्या अंतर्गत, वितरण परवानाधारकांकडून अध्यक्ष आणि दोन सदस्य असलेले ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच (सीजीआरएफ), स्थापन करण्यात आले आहेत आणि दोन विद्युत लोकपाल (मुंबई आणि नागपूर) यांची नियुक्ती आयोगाकडून करण्यात आली आहे. या यंत्रणेंतर्गत ग्राहकांना त्यांच्या गाऱ्हाण्यांचे निवारण आणि काही प्रकरणांत नुकसानभरपाई न्यायालयात न जाता प्राप्त करुन घेणे शक्य झाले आहे.

## ८.१ ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच

आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये महाराष्ट्रात २० ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच कार्यरत होते. त्यापैकी १६ मंच हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने स्थापन केले आहेत आणि उर्वरित मंच बेस्ट, आरइन्फ्रा-वितरण आणि टाटा पॉवर कंपनी-वितरण आणि माईंडस्पेस बिझनेस पार्क प्रा.लि.(एमबीपीपीएल) या अन्य वितरण परवानाधारकांनी स्थापन केले आहेत. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच आणि विद्युत लोकपाल) विनियम २००६ अंतर्गत, या मंचाचा एक सदस्य, जो ग्राहक संस्थांचे प्रतिनिधित्व करतो, आयोगाकडून नामनिर्देशित करण्यात येतो. परवानाधारकाने नेमावयाच्या अध्यक्षांचे पात्रता निकष ठरवून देण्यात आले आहेत. तिसरा सदस्य परवानाधारकाचे प्रतिनिधित्व करतो.

आर्थिक वर्ष २०१६-१७ मधील ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांच्या कामगिरीची थोडक्यात माहिती खालील अ ते ड या तक्त्यांमध्ये देण्यात आली आहे:-

### तक्ता अ

**महावितरण कंपनीच्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांकडे प्राप्त झालेली गाऱ्हाणी**

| अ.क्र. | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे नाव (परिमंडल) | सुरुवातीच्या दिनांकास प्रलंबित असलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | त्या वर्षात प्राप्त झालेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | दाखल न करुन घेतलेल्या किंवा मागे घेतलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | कार्यवाही योग्य गाऱ्हाण्यांची संख्या | निवारण केलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | | | २०१६-१७ च्या अखेरीस प्रलंबित गाऱ्हाण्यांची संख्या | ग्राहकांच्या बाजूने निर्णय दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | परवानाधारकाच्या बाजूने निकाल दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ६० दिवसांच्या आत | ६० दिवसांच्या नंतर | एकूण | | | |
| १ | अमरावती | १ | १७ | १ | १७ | १४ | २ | १६ | १ | १५ | १ |
| २ | औरंगाबाद | ५ | ४० | ० | ४५ | २९ | ६ | ३५ | १० | २१ | १४ |
| ३ | भांडूप | ३३ | १०२ | ० | १३५ | २५ | ५६ | ८१ | ५४ | ४६ | ३५ |
| ४ | कल्याण | १४७ | १४९ | १० | २८६ | २८ | ९३ | १२१ | १६५ | ७३ | ४८ |
| ५ | कोल्हापूर | १६ | ७६ | ३ | ८९ | ४२ | २७ | ६९ | २० | ५५ | १४ |
| ६ | कोकण | २ | १४ | ० | १६ | १२ | १ | १३ | ३ | १० | ३ |
| ७ | लातूर | ११ | १५ | ० | २६ | २ | १५ | १७ | ९ | १३ | ४ |
| ८ | नागपूर (शहरी) | २३ | १९८ | ० | २२१ | १९५ | २ | १९७ | २४ | ११७ | ८० |
| ९ | नाशिक | ९ | ८५ | ० | ९४ | ७९ | ० | ७९ | १५ | ६० | १९ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | पुणे | ५ | ७३ | ० | ७८ | ७१ | ३ | ७४ | ४ | ४८ | २६ |
| ११ | नांदेड | ० | ७ | ० | ७ | १ | २ | ३ | ४ | २ | १ |
| १२ | जळगांव | ८ | ३० | ० | ३८ | २१ | ७ | २८ | १० | १६ | १२ |
| १३ | बारामती | ० | ३१ | २ | २९ | २० | ६ | २६ | ३ | ११ | १५ |
| १४ | गोंदिया | ० | ४ | ० | ४ | ३ | १ | ४ | ० | २ | २ |
| १५ | चंद्रपूर | १ | ८ | १ | ८ | ५ | ० | ५ | ३ | ० | ५ |
| १६ | अकोला | १ | ३८ | ० | ३९ | २६ | ४ | ३० | ९ | २६ | ४ |
| | **एकूण** | **२६२** | **८८७** | **१७** | **११३२** | **५७३** | **२२५** | **७९८<br>७०.४९%** | **३३४** | **५१५<br>६४.५४%** | **२८३<br>३५.४६%** |

## तक्ता ब

## अन्य परवानाधारकांच्या ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचांकडे प्राप्त झालेली गाऱ्हाणी

| अ.क्र. | ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाचे नाव | सुरुवातीच्या दिनांकास प्रलंबित असलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | त्या वर्षात प्राप्त झालेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | दाखल न करुन घेतलेल्या किंवा मागे घेतलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | कार्यवाही योग्य गाऱ्हाण्यांची संख्या | निवारण केलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | | | २०१६-१७ च्या अखेरीस प्रलंबित गाऱ्हाण्यांची संख्या | ग्राहकांच्या बाजूने निर्णय दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या | परवानाधारकाच्या बाजूने निकाल दिलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ६० दिवसांच्या आत | ६० दिवसांच्या नंतर | एकूण | | | |
| १ | आरइन्फ्रा-वितरण | १ | २६ | ७ | २० | ५ | १३ | १८ | २ | १ | १७ |
| २ | टीपीसी - वितरण | ० | ४ | ० | ४ | ४ | ० | ४ | ० | ० | ४ |
| ३ | बेस्ट | ६ | २५ | २ | २९ | १९ | ५ | २४ | ५ | १७ | ७ |
| ४ | एमबीपीपीएल | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **७** | **५५** | **९** | **५३** | **२८** | **१८** | **४६<br>८६.७९%** | **७** | **१८<br>३९.१३%** | **२८<br>६०.८७%** |

## तक्ता क

## ग्राहक वर्गवारीनुसार निवारण करण्यात आलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या

| ग्राहकांची वर्गवारी | महावितरण | आरइन्फ्रा-वितरण | टीपीसी- वितरण | बेस्ट | एमबीपीपीएल | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| निवासी | २४६ | १० | १ | १३ | ० | २७० |
| वाणिज्यिक | ११२ | ८ | १ | १० | ० | १३१ |
| कृषी | १२५ | ० | ० | ० | ० | १२५ |
| औद्योगिक | २४० | ० | ० | १ | ० | २४१ |
| अन्य | ७५ | ० | २ | ० | ० | ७७ |
| **एकूण** | **७९८** | **१८** | **४** | **२४** | **०** | **८४४** |

तक्ता ड

**विषयानुसार निवारण करण्यात आलेल्या गाऱ्हाण्यांची संख्या**

| गाऱ्हाण्यांचा विषय | महावितरण | आरइन्फ्रा-वितरण | टीपीसी- वितरण | बेस्ट | एमबीपीपीएल | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| देयकाशी संबंधित | ४८८ | ११ | १ | १६ | ० | ५१६ |
| सदोष मीटर | २ | ० | ० | ० | ० | २ |
| तांत्रिक | २४ | ० | १ | ० | ० | २५ |
| नवीन जोडणी | १४५ | ४ | ० | ४ | ० | १५३ |
| पुरवठ्याचा दर्जा | ९ | ० | ० | ० | ० | ९ |
| सेवेशी संबंधित | २७ | ० | ० | ० | ० | २७ |
| अन्य | १०३ | ३ | २ | ४ | ० | ११२ |
| | ७९८ | १८ | ४ | २४ | ० | ८४४ |

## ८.२ विद्युत लोकपाल

पहिल्या विद्युत लोकपाल यांच्या कार्यालयाची स्थापना २७ डिसेंबर, २००४ रोजी मुंबई येथे करण्यात आली. ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाच्या निर्णयाने बाधित झालेले ग्राहक विद्युत लोकपाल यांच्याकडे दाद मागू शकतात. राज्यात मुंबई आणि नागपूर येथे दोन विद्युत लोकपाल कार्यरत आहेत.

### विद्युत लोकपाल (मुंबई)

श्री आर. डी. संखे हे विद्युत लोकपाल, मुंबई, म्हणून ७ एप्रिल, २०१४ पासून कार्यरत आहेत.विद्युत लोकपाल, मुंबई, यांच्या कार्यकक्षेत कोकण, पुणे व नाशिक हे महसुली विभाग येतात.

### विद्युत लोकपाल (नागपूर)

न्यायमूर्ती (निवृत्त) श्री के. जे. रोही हे ५ जानेवारी, २०१७ रोजी निवृत्त होईपर्यंत विद्युत लोकपाल, नागपूर, म्हणून कार्यरत होते. त्यानंतर श्रीमती चित्कला झुत्सी या विद्युत लोकपाल, नागपूर, म्हणून १७ फेब्रुवारी, २०१७ पासून कार्यरत आहेत. विद्युत लोकपाल, नागपूर, यांच्या कार्यकक्षेत अमरावती, औरंगाबाद आणि नागपूर, हे महसुली विभाग येतात.

खालील तक्ता-इ मध्ये विद्युत लोकपाल यांनी आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये हाताळलेल्या अभिवेदनांची संख्या दाखविण्यात आली आहे.

**विद्युत लोकपाल यांनी हाताळलेली अभिवेदने**

तक्ता-इ

| अ.क्र. | विद्युत लोकपाल | सुरुवातीच्या दिनांकास प्रलंबित असलेल्या अभिवेदनांची संख्या | त्या वर्षात प्राप्त झालेल्या अभिवेदनांची संख्या | दाखल न करुन घेतलेल्या किंवा मागे घेतलेल्या अभिवेदनांची संख्या | कार्यवाही योग्य अभिवेदनांची संख्या | निवारण केलेल्या अभिवेदनांची संख्या | | | २०१६-१७ च्या अखेरीस एकूण प्रलंबित अभिवेदनांची संख्या | ग्राहकांच्या बाजूने दिलेल्या निकालांची संख्या | परवानाधारकांच्या बाजूने दिलेल्या निकालांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ६० दिवसांच्या आत | ६० दिवसांच्या नंतर | एकूण | | | |
| १ | नागपूर | ३६ | ७४ | ० | ११० | ९ | ५८ | ६७ | ४३ | ४१ | २६ |
| २ | मुंबई | १० | १८२ | २ | १९० | १३६ | ४४ | १८० | १० | ११७ | ६३ |
| | एकूण | ४६ | २५६ | २ | ३०० | १४५ | १०२ | २४७ | ५३ | १५८ | ८९ |

## ८.३ प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी

आयोगाने ग्राहक आधारासंबंधात घेतलेल्या पुढाकारांचा एक भाग म्हणून आणि महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागातील ग्राहक प्रतिनिधींना आयोगाच्या कामकाजात समाविष्ट करुन घेण्याच्या उद्देशाने, आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०१२ अंतर्गत सहा संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी आणि पाच व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधींची नियुक्ति केली आहे.

आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रिकल्चरचा समावेश संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी म्हणून करण्यात आला. प्राधिकृत संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी खालीलप्रमाणे आहेत-

| | | |
|---|---|---|
| १ | कोकण विभाग | ठाणे बेलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन |
| २ | उत्तर महाराष्ट्र विभाग | महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज व ॲग्रिकल्चर (नाशिक) |
| ३ | पश्चिम महाराष्ट्र विभाग | प्रयास एनर्जी ग्रुप |
| ४ | मराठवाडा विभाग | चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रिकल्चर (औरंगाबाद) |
| ५ | विदर्भ विभाग | विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन |
| ६ | मुंबई | मुंबई ग्राहक पंचायत |

व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधी कमाल ३ वर्षांच्या कालावधीसाठी प्राधिकृत करण्यात येतील, असे विनियम ६ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार, आयोगाने दि. १२ सप्टेंबर, २०१६ च्या अधिसूचनेन्वये पाच व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधींना ३ वर्षांच्या कालावधीसाठी प्राधिकृत केले आहे.

व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधी खालीलप्रमाणे आहेत-

| अनु.क्र. | व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधींची नावे |
|---|---|
| १ | श्री हेमंत अरुणचंद्र कापडिया, औरंगाबाद |
| २ | डॉ. हरिभाऊ गोरख बाऱ्हाटे, श्रीरामपूर, जिल्हा - अहमदनगर |
| ३ | श्री सुनिल डेव्हीड सोनावणे, श्रीरामपूर, जिल्हा - अहमदनगर |
| ४ | श्री प्रणेता रविंद्र देसले, धुळे, दहिवेल, तालुका साक्री, जिल्हा धुळे |
| ५ | डॉ. अनिल गुंडेराव अनिखिंडी, कोल्हापूर |

या पाच वैयक्तिक ग्राहक प्रतिनिधींची निवड आणि चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज ॲण्ड ॲग्रिकल्चर यांची अतिरिक्त संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी म्हणून निवड करण्याची शिफारस विनियमांतर्गत गठीत करण्यात आलेल्या समितीकडून करण्यात आली आणि या समितीच्या अध्यक्षपदी संचालक, टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स, मुंबई, हे होते.

# ९.माहितीचा अधिकार कायदा

आयोग माहितीच्या अधिकार, २००५ अंतर्गत कोणत्याही नागरिकास माहिती देते. आयोगाचे श्री पी. डी. मोहरे, कक्ष अधिकारी आणि श्री अनिलकुमार उके, उप-संचालक (विधी) हे माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत अनुक्रमे जन माहिती अधिकारी (पीआयओ) आणि प्रथम अपील प्राधिकारी (एफएए) आहेत.

माहितीचा अधिकार कायद्यांतर्गत आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्राप्त झालेले आणि निकालात काढलेले अर्ज/अपील यांचा तपशील खालील तक्त्यात देण्यात आला आहे:

| अनु.क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | माहितीच्या अधिकारांतर्गत जन माहिती अधिकाऱ्यास प्राप्त झालेले अर्ज | ९५ |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडून माहिती देण्यात आलेल्या अर्जांची संख्या | ९५ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेले अर्ज | ० |
| ४ | प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडे दाखल झालेल्या अपीलांची संख्या | २० |
| ५ | प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडून निकालात काढण्यात आलेल्या अपिलांची संख्या | २० |
| ६ | प्रथम अपील प्राधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेल्या अपीलांची संख्या | ० |
| ७ | विहित कालमर्यादेत निकालात न काढण्यात आलेल्या अर्ज/अपीलांची संख्या | ० |

# १०.वार्षिक लेखे - एक दृष्टीक्षेप (आर्थिक वर्ष २०१६-१७)

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास महाराष्ट्र शासनाकडून दरवर्षी रुपये १ लाखांची लाक्षणिक मदत मिळते. आयोगाचे खर्च मुख्यतः मविनिआ (शुल्क आणि आकार) विनियम, २००४ अंतर्गत परवाना शुल्क आणि याचिकांवरील शुल्क यापासून प्राप्त झालेल्या जमा रकमा आणि राष्ट्रीयकृत बँकांकडे ठेवलेल्या मुदत ठेवींवर मिळणाऱ्या व्याजातून भागविण्यात येतो.

आयोगास मिळणाऱ्या एकूण जमा रकमेत आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये वार्षिक परवाना शुल्काचा ६९.८४ टक्के (आ.व. २०१५-१६ मध्ये ६९ टक्के) सर्वात मोठा वाटा आहे तर दुसरा सर्वात मोठा वाटा मुदत ठेवींवर मिळाणाऱ्या व्याजाचा २६.५२ टक्के (आ.व. २०१५-१६ मध्ये २३ टक्के) आहे. आयोगास मिळणाऱ्या वार्षिक जमा रकमेतून वेतन, कार्यालयीन भाडे, प्रशिक्षण खर्च, कार्यालयीन खर्च, सल्लागारांचे शुल्क इ. दैनंदिन बाबींवरील खर्च भागविण्यात येतो आणि उरलेली शिल्लक रक्कम दरवर्षी राष्ट्रीयकृत बँकांमधील मुदत ठेवींमध्ये गुंतविण्यात येते.

आयोगाकडून होणाऱ्या खर्चापैकी सर्वात मोठी खर्चाची बाब म्हणजे भाडे, दर व करांवरील खर्चाची रक्कम असून, त्यात मुख्यत्वेकरुन जागतिक व्यापार केंद्र येथील कार्यालयीन जागेच्या भाड्यासाठी द्याव्या लागणाऱ्या रकमेचा समावेश आहे. ही रक्कम आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये आयोगाच्या एकूण खर्चाच्या ३२.०७ टक्के (आ.व. २०१५-१६ मध्ये ३३ टक्के) आहे. दुसऱ्या क्रमांकावरील खर्चाची सर्वात मोठी बाब म्हणजे आयोगाला नियामक कार्यासंबंधी मदत व सल्ला देणाऱ्या तांत्रिक, कायदेशीर आणि वित्तीय सल्लागारांना द्याव्या लागणाऱ्या शुल्कावरील खर्चाची रक्कम असून ही एकूण खर्चाच्या २६.२७ टक्के (आ.व. २०१५-१६ मध्ये २७ टक्के) आहे. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर खर्चाची सर्वात मोठी बाब म्हणजे वेतनावरील खर्चाची बाब असून ती एकूण खर्चाच्या २३.६३ टक्के (आ.व. २०१५-१६ मध्ये २२ टक्के) आहे.

मुंबई व नागपूर येथील विद्युत लोकपाल यांच्या कार्यालयांचे वेतन आणि अन्य सर्व दैनंदिन खर्च हा आयोगाकडून करण्यात येतो आणि तो आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये आयोगाच्या एकूण खर्चाच्या ८.४५ टक्के (आ.व. २०१५-१६ मध्ये ८ टक्के) इतका दरवर्षी होत आहे.

आयोगाची ३१ मार्च, २०१७ अखेरची राष्ट्रीयकृत बँकांमधील मुदत ठेवीमधील एकूण संचयी गुंतवणूक रु. १६८.५४ कोटी आहे.

आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये एकूण जमा रक्कम रु. ५३.८४ कोटी होती व एकूण खर्च रु. १९.३५ कोटी होता व उरलेली एकूण नक्त शिल्लक रु. ३४.४९ कोटी राष्ट्रीयकृत बँकांमधील मुदत ठेवींमध्ये गुंतविण्यात आली आहे.

(आर्थिक वर्ष २०१६-१७ साठीची आकडेवारी ही तात्पुरती आकडेवारी आहे. ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठीचा तात्पुरता आय-व्यय लेखा सोबत परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आला आहे.)

## आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्राप्त झालेल्या रकमा टक्केवारीत दाखविणारा तक्ता




## आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये झालेला खर्च टक्केवारीत दाखविणारा तक्ता



## परिशिष्ट - १

### ३१ मार्च, २०१७ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी तात्पुरता आय-व्यय लेखा

(रक्कम रुपयात)

| आय | चालू वर्ष २०१६-१७ | मागील वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|
| **(१) सुरुवातीची शिल्लक** | **१,५३०,८७८,०४६.०२** | **१,२१७,११९,००१.९६** |
| (अ) रोख शिल्लक | ११,५७८.०० | ७०,६४३.०० |
| (ब) बँकेतील शिल्लक (एस बी आय) | – | – |
| (१) चालू खात्यात | – | – |
| (२) ठेव खात्यात | १,५२१,०७८,३६८.०० | १,१८८,६६५,९३४.०० |
| (३) बचत खात्यात | ९,७८८,१००.०२ | २८,३८२,४२४.९६ |
| **(२) प्राप्त अनुदान** | **९०,०००.००** | **१००,०००.००** |
| (अ) महाराष्ट्र शासनाचे अनुदान | ९०,०००.०० | १००,०००.०० |
| (ब) अन्य स्रोतांकडून (तपशील) | – | – |
| मांडवली खर्चासाठी अनुदान | – | – |
| महसुली खर्चासाठी अनुदान | – | – |
| **(३) खालील गुंतवणुकींपासून मिळालेले उत्पन्न** | | |
| (अ) राखून ठेवलेले / एंडोमेंट निधी | – | – |
| (ड) स्व-निधी (अन्य गुंतवणुका) | – | – |
| **(४) आयोगाकडील जमा रकमा** | | |
| **(अ) आयोगाने आकारलेले शुल्क** | **३७७,१६८,८५५.००** | **४२२,६७४,०६९.००** |
| (१) सुरुवातीच्या परवान्यासाठी शुल्क | – | – |
| (२) वार्षिक परवाना शुल्क | ३५१,४३२,३९३.०० | ३७८,४४८,४७६.०० |
| (३) व्यापारी परवान्यासाठी शुल्क | – | – |
| (४) माहितीच्या अधिकारासाठी शुल्क | २,१८८.०० | ३,२०७.०० |
| (५) दस्तावेजांसाठी शुल्क | १७,०३८.०० | ७,९९४.०० |
| (६) वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासाठी शुल्क | – | – |
| (७) तपासणीसाठी शुल्क | – | – |
| (८) अर्ज दाखल करण्यासाठी शुल्क | १८,००५,८९६.०० | ४४,१८४,५०६.०० |
| (९) नोकरीसाठीच्या अर्जाचे शुल्क | – | – |
| (१०) वार्षिक वीज दराच्या आढाव्यासाठी शुल्क | – | – |
| (११) वीज दराच्या निश्चितीकरणासाठी शुल्क | – | – |
| (१२) वार्षिक परवाना शुल्क विलंबाने भरण्यासाठीचा दंड | ७,७११,३४०.०० | २९,८८६.०० |
| **(ब) प्राप्त व्याज** | **१६६,१५९,०८३.००** | **११४,५५४,१९५.५०** |
| (१) बँकेतील ठेवींवरील व्याज | १६६,१५९,०८३.०० | ११४,५५४,१९५.५० |
| (२) कर्मचारी इ.ना दिलेल्या कर्ज, अग्रिमावरील व्याज | – | – |
| **(क) अन्य उत्पन्न** | **५४०,२८१.००** | **१३,६९२.००** |
| (१) संकीर्ण जमा रकमा | ५४०,२८१.०० | १३,६९२.०० |
| **शिल्लक पुढील पानावर** | **२,०७४,८३६,२६५.०२** | **१,७५४,४६०,९५८.४६** |

| व्यय | चालू वर्ष २०१६-१७ | मागील वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|
| **(१) खर्च** | | |
| **(अ) आस्थापना खर्च** | **४०,६२७,४८८.००** | **४३,१६५,७६४.००** |
| (१) आयोगाचे अध्यक्ष, सदस्य व सचिव यांचे वेतन व भत्ते | ३,२२५,१०२.०० | ४,०२१,१३९.०० |
| (२) अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते | ३५,३३९,४००.०० | ३१,२३१,२०२.०० |
| (३) बोनस व मानधन | – | – |
| (४) अतिकालिक भत्ता | २७९,८७६.०० | ४३६,६३६.०० |
| (५) वैद्यकीय व आरोग्य सेवा सुविधा | १,४२१,९७१.०० | १,३१९,१५२.०० |
| (६) अन्य कोणतीही बाब | | |
| सदस्यांच्या निवासाचे भाडे | – | – |
| बेस्ट कर्मचा-यांच्या वेतनाची प्रतिपूर्ती | – | – |
| रजा प्रवास सवलत | – | – |
| प्रोत्साहने | | ९५६,५००.०० |
| अन्य भत्ते (दूरध्वनी आणि नियतकालिके) | | |
| (७) भ. नि. निधीची वर्गणी | – | २,५५५,९७०.०० |
| (८) अन्य कोणत्याही निधीला वर्गणी | | |
| (९) कर्मचारी कल्याण निधी | ३६१,१३९.०० | ४९६,७१०.०० |
| (१०) कर्मचाऱ्यांना निवृत्तीविषयक मिळणाऱ्या लाभांवरील खर्च | – | १,९२४,२८८.०० |
| (११) विद्यावेतनधारी नियामक विश्लेषकांवरील खर्च | – | २२४,१६७.०० |
| **(ब) अन्य प्रशासकीय खर्च** | **१३४,७४९,४८५.७९** | **१४८,९४९,५१४.१६** |
| (१) खरेदी | – | – |
| (२) वाहणावळ खर्च | – | – |
| (३) विद्युत शुल्क | १,२१४,०३६.०० | १,१४२,१४७.०० |
| (४) पाणी आकार | – | – |
| (५) विमा | – | – |
| (६) दुरुस्ती, देखभाल व नूतनीकरण | ३४४,२८४.०० | २१८,८९९.०० |
| (७) भाडे दर व कर | ६२,०५५,९८७.०० | ६२,१८२,८५७.०० |
| (८) वाहने चालविण्यावरील व देखभालीचा खर्च | ३,०७४,९८५.०० | २,६२८,७७२.०० |
| (९) टपाल, दूरध्वनी व दूरसंचार | ३५०,४६५.०० | ३२८,९५६.०० |
| (१०) छपाई व लेखनसामग्री | ७२२,०४६.०० | ६९९,५५८.०० |
| (११) प्रवास व वाहन खर्च | - | - |
| परदेश प्रवास | ३७२,९५३.०० | - |
| देशांतर्गत प्रवास | १,३५८,८६१.०० | २,१४४,१४९.०० |
| वाहन खर्च | ३७,२५७.०० | ८१,२८२.०० |
| (१२) चर्चासत्रे व कार्यशाळांवरील खर्च | - | - |
| (१३) प्रशिक्षण सत्रांवरील खर्च | २०१,०३३.०० | ८७,१२५.०० |
| (१४) वर्गण्यांवरील खर्च | १,३५१,०३२.०० | १,४२०,३४४.०० |
| (१५) शुल्कांवरील खर्च | – | – |
| (१६) लेखापरीक्षकांचा मोबदला | २८५,८३६.०० | |
| (१७) आदरातिथ्यावरील खर्च | – | – |
| **शिल्लक पुढील पानावर** | **१७५,३७६,९७३.७९** | **१९२,११५,२७८.१६** |

| आय | चालू वर्ष २०१६-१७ | मागील वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|
| **मागील पानावरून** | **२,०७४,८३६,२६५.०२** | **१,७५४,४६०,९५८.४६** |
| **(ड) गुंतवणुका** | - | - |
| (१) रोखीकृत केलेल्या गुंतवणूकींचे दर्शनी मूल्य | - | - |
| (२) गुंतवणुकींवरील व्याज | - | - |
| **(५) कर्मचाऱ्यांकडून अग्रिमांची वसुली** | **३,९४८,३५०.००** | **२,६५६,७८९.७२** |
| (१) गृह बांधणी अग्रिम | १,२१२,११४.०० | ७०१,१७९.०० |
| (२) मोटर कार/ वैयक्तिक संगणक अग्रिम स्कुटर/मोटर सायकल अग्रिम | ४३,४०२.०० | २६,४००.०० |
| (३) अन्य अग्रिम | - | ३४,२९६.७२ |
| कर्ज हप्ता | - | - |
| खर्चासाठी अग्रिम | २,४९२,८३४.०० | १,७७८,९१४.०० |
| वेतनापोटी अग्रिम | - | - |
| (४) उत्सवासाठी अग्रिम | २००,०००.०० | ११६,०००.०० |
| **(६) आकस्मिक अग्रिमांची वसुली** | - | **२४६,०७५.००** |
| (१) सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेला अग्रिम | - | - |
| (२) पुरवठादारांना दिलेला अग्रिम | - | २४६,०७५.०० |
| (३) अन्य अग्रिम | - | |
| **(७) अन्य ठेवी** | **४,५६२,३७१,३९०.००** | **२७५,२८९.००** |
| (१) सुरक्षा अनामत | ३११,९९०.०० | २५,२८९.०० |
| (२) इसारा अनामत रक्कम | ३२०,०००.०० | २५०,०००.०० |
| (३) अन्य कोणत्याही ठेवी | - | - |
| दूरध्वनी ठेवी | - | - |
| अन्य ठेवी | ३,९२२,०००,०००.०० | - |
| लघु मुदतीच्या ठेवी | ६३९,७३९,४००.०० | - |
| **(८) प्राप्त झालेल्या रकमा** | **१७,४३३,८४९.००** | **१८,४२८,४३३.००** |
| (अ) प्रतिनियुक्तीवरील कर्मचाऱ्यांकडून वसुली | | - |
| (ब) परवाना शुल्क | | - |
| (क) प्राप्ति -कर (टीडीएस) | १३,८२८,६५७.०० | १४,७६६,३५१.०० |
| (ड) अधिभार | - | - |
| (इ) विक्री-कर | - | - |
| (फ) केंद्र सरकारची आरोग्य योजना | २,०००.०० | - |
| (ग) पोस्टल विमा योजना | - | - |
| (ह) अन्य कोणतेही | - | - |
| सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी | ६९३,०००.०० | ८७८,०००.०० |
| गट विमा योजना | १४,८०४.०० | १५,७२०.०० |
| व्यावसायिक कर | १०५,४००.०० | ११४,६००.०० |
| मविनिआ कर्मचारी पी एफ मधील हिस्सा | २,६८६,३१६.०० | २,५८१,१५३.०० |
| निवासी भाडे | १०,५६५.०० | २५,३५६.०० |
| घरभाडे भत्ता | १३,८३६.०० | ५,७६५.०० |
| केंद्रीय भविष्य निर्वाह निधी | ३३,९४५.०० | - |
| गृहनिर्माण परवाना शुल्क | ४५,३२६.०० | ४१,४८८.०० |
| **शिल्लक पुढील पानावर** | **६,६५८,५८९,८५४.०२** | **१,७७६,०६७,५४५.१८** |

| व्यय | चालू वर्ष २०१६-१७ | मागील वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|
| **मागील पानावरून** | **१७५,३७६,९७३.७९** | **१९२,११५,२७८.१६** |
| (१८) व्यावसायिकांचे आकार | ५२,९९२,४०१.०० | ६७,७१३,१६६.०० |
| (१९) वर्तमानपत्रे/नियतकालिके | ३७,३६८.०० | ५९,६४६.०० |
| (२०) निर्लेखित केलेली बुडीत रक्कम | - | - |
| (२१) जाहिरात व प्रसिध्दी | ४,०२०,६६९.०० | ३,०५३,०४७.०० |
| (२२) अन्य- | - | - |
| बँक आकार | ७,३८५.७९ | ७,४८४.१६ |
| कार्यालयीन खर्च | १,९५९,४३५.०० | २,०७३,१५५.०० |
| उपकरणांचे भाडे | ३६६,२९८.०० | ४०८,४५१.०० |
| वापरुन संपणारी कार्यालयीन सामग्री | - | - |
| जाहीर सुनावण्यांवरील खर्च | २,२७६,६१२.०० | ६८१,१५७.०० |
| बैठकांवरील खर्च | ८५,८७६.०० | १,८४९,३८५.०० |
| संगणकांवरील खर्च | १,२९५,३३५.०० | १,७६१,१५०.०० |
| संकीर्ण खर्च | ३३९,३३१.०० | ४०८,७८४.०० |
| (२३) ताळमेळ समायोजन खर्च | - | - |
| **(२) शुल्काचा परतावा** | - | - |
| **(३) केलेल्या गुंतवणुका व ठेवी** | **४,५८८,६४८,५६१.००** | **१,६७६,६१४.००** |
| (अ) गुंतवणुका | - | - |
| (१) राखून ठेवलेल्या/ एंडोमेंट निधीतून केलेल्या गुंतवणुका | - | - |
| (२) स्व-निधीतून केलेल्या गुंतवणुका | - | - |
| (ब) ठेवी | ६६६,२६६,८११.०० | |
| (१) सुरक्षा अनामत | १२६,७५०.०० | ४८०,०२८.०० |
| (२) इसारा अनामत रक्कम | २५५,०००.०० | ९९०,०००.०० |
| (२) लघु मुदतीच्या ठेवी | ३,९२२,०००,०००.०० | - |
| (क) पुरवठादारांना दिलेले अग्रिम | - | २०६,५८६.०० |
| **(४) कर्मचाऱ्यांना अग्रिम** | **२,८९१,१८१.००** | **१५,०६५,०१३.००** |
| (१) गृह निर्माण अग्रिम | - | १२,५७०,०००.०० |
| (२) मोटर कार/ वैयक्तिक संगणक अग्रिम/ स्कुटर/मोटर सायकल अग्रिम | ६०,०००.०० | - |
| (३) उत्सव अग्रिम | १७१,०००.०० | १९०,०००.०० |
| (४) अन्य अग्रिम | - | - |
| कर्जाचा हप्ता | - | - |
| खर्चासाठी अग्रिम | २,६६०,१८१.०० | २,०९१,१६३.०० |
| स्थिर मत्तेपोटी अग्रिम | - | २१३,८५०.०० |
| **(५) आकस्मिक अग्रिमाची वसुली** | **२८,५००.००** | - |
| (१) सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेला अग्रिम | - | - |
| (२) पुरवठादारांना दिलेले अग्रिम | - | - |
| (३) अन्य अग्रिम | - | - |
| शुल्काचा परतावा | २८,५००.०० | - |
| **(६) अन्य प्रदाने** | **१४५,८३३,८३६.००** | **१८,४१७,१५०.००** |
| (अ) जीपीएफ/सीपीएफ | ७२२,०००.०० | ८०८,०००.०० |
| **शिल्लक पुढील पानावर** | **४,९१२,७७९,०५१.७९** | **२२७,२७४,०५५.१६** |

| आय | चालू वर्ष २०१६-१७ | मागील वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|
| **मागील पानावरून** | **६,६५८,५८९,८५४.०२** | **१,७७६,०६७,५४५.१८** |
| **(९) खर्चाची प्रतिपूर्ती आणि परतावा** | **७२३,४२९.००** | **१,०६८,४१४.००** |
| (१) व्यावसायिक खर्च | ३७५,६४४.०० | ७८३,६००.०० |
| (२) कार्यालयीन खर्च | १५३,०००.०० | - |
| (३) दौरे व प्रवास | २,६३३.०० | २८४,८१४.०० |
| (४) भाडे, दर आणि कर | - | - |
| (५) अन्य खर्च | ५६,८०६.०० | - |
| (६) पगार आणि वेतन | १३५,३४६.०० | - |
| **(१०) स्थिर मत्तांची वसुली** | **४५०.००** | **२२,२६२.००** |
| (अ) जमीन | - | - |
| (ब) इमारत | - | - |
| (क) फर्निचर | - | - |
| (ड) यंत्रसामग्री आणि उपकरणे | - | - |
| (इ) मोटर वाहन | - | - |
| (फ) पुस्तके आणि नियतकालिके | ४५०.०० | - |
| (ग) चालू भांडवली कामे | - | - |
| (ह) अन्य कोणतीही बाब | - | - |
| कार्यालयीन उपकरणे | - | - |
| अंतर्गत नूतनीकरण | - | - |
| संगणक | - | २२,२६२.०० |
| दूरध्वनी उपकरणे | - | |
| इपीबीएक्स यंत्रणा | - | |
| विद्युत संच मांडणी | | |
| **एकूण (रुपये)** | **६,६५९,३१३,७३३.०२** | **१,७७७,१५८,२२१.१८** |

| व्यय | चालू वर्ष २०१६-१७ | मागील वर्ष २०१५-१६ |
|---|---|---|
| **मागील पानावरून** | **४,९१२,७७९,०५१.७९** | **२२७,२७४,०५५.१६** |
| (ब) परवाना शुल्क | - | - |
| (क) प्राप्ति-कर (टीडीएस) | १४२,२५९,५३५.०० | १४,७६६,३५१.०० |
| (ड) केंद्र सरकारी आरोग्य योजना | २,०००.०० | - |
| (इ) पोस्टल विमा योजना | - | - |
| (फ) गट विमा योजना | ८,०२४.०० | १५,१२०.०० |
| (ग) अन्य कोणतीही वसुली | - | - |
| सर्वसाधारण निर्वाह निधी | - | - |
| कर्ज वसुली प्रदान | - | - |
| व्यावसायिक कर | १५९,४००.०० | ११४,७००.०० |
| मविनिआ कर्मचारी भनिनि वर्गणी | २,६२६,९८६.०० | २,२५८,५४०.०० |
| निवासी भाडे | १०,५६५.०० | ३०,२९५.०० |
| घरभाडे भत्ता | - | - |
| रोखून ठेवलेले वेतन | - | ३६९,४२८.०० |
| गृह बांधणी अग्रिम | - | १३,७४६.०० |
| गृहनिर्माण परवाना शुल्क | ४५,३२६.०० | ४०,९७०.०० |
| **(७) वर्गणी** | **१५,८२७,८०९.७०** | **१६,२२८,१६०.००** |
| (अ) निवृत्तीवेतन व उपदान निधी | - | १६०,०००.०० |
| (ब) रजा वेतन आणि निवृत्तीवेतन वर्गणी | | ४३२,१६०.०० |
| (क) अन्य वर्गण्या | - | - |
| विद्युत लोकपालांना अनुदान | १५,८२७,८०९.७० | १५,६३६,०००.०० |
| **(८) स्थिर मत्तांवरील खर्च** | **२,९८५,७६५.००** | **२,७७७,९६०.००** |
| (अ) जमीन | - | - |
| (ब) इमारत | - | - |
| (क) फर्निचर व फिक्स्चर्स | - | - |
| (ड) यंत्रसामग्री व उपकरणे | - | - |
| (इ) मोटर वाहने | - | - |
| (फ) पुस्तके व नियतकालिके | १०,२३४.०० | ११,२०५.०० |
| (ग) चालू भांडवली कामे | २,२४८,७४०.०० | २,२४८,७४१.०० |
| (ह) अन्य कोणतीही बाब | - | - |
| कार्यालयीन साधनसामग्री | ४९९.०० | ७१,९१०.०० |
| अंतर्गत नूतनीकरण | ३११,४०१.०० | - |
| संगणक आणि सॉफ्टवेअर | २८८,८९३.०० | ३९४,५१९.०० |
| दूरध्वनी उपकरणे | १२५,९९८.०० | ५१,५८५.०० |
| इपीबीएक्स यंत्रणा | - | - |
| विद्युत संच मांडणी | - | - |
| **(९) अखेरची शिल्लक** | **१,७२७,७२१,१०६.५३** | **१,५३०,८७८,०४६.०२** |
| रोख शिल्लक | ३४,८३३.०० | ११,५७८.०० |
| (ब) बँक शिल्लक | - | - |
| (एस बी आय) | | - |
| (१) चालू खात्यात | ३८४,४४०.३० | - |
| (२) ठेव खात्यात | १,६८५,३७०,२३३.०० | १,५२१,०७८,३६८.०० |
| (३) बचत खात्यात | ४१,९३१,६००.२३ | ९,७८८,१००.०२ |
| **एकूण (रुपये)** | **६,६५९,३१३,७३३.०२** | **१,७७७,१५८,२२१.१८** |

ठिकाण: मुंबई

दिनांक: २४/१०/२०१७

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग करिता**

सचिव  सदस्य  सदस्य  अध्यक्ष

## परिशिष्ट - २ : आयोगाने आर्थिक वर्षे २०१६-१७ मध्ये पारित केलेले आदेश

| अ. क्र. | प्रकरण क्र. | विषय | आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २०१५ चा १४४ | टाटा पॉवर कंपनी लि. च्या निर्मिती व्यवसायाची दुष्काळ बाधित क्षेत्रात ३ एमसीएम पाणी सोडण्यासाठी भिरा निर्मिती केंद्राच्या वार्षिक स्थिर आकारांच्या वसुलीसाठी याचिका | ०६ एप्रिल, २०१६ |
| २ | २०१४ चा १२९ | महाराष्ट्र सीमलेस लि. ची त्यांच्या विले भागड इंडस्ट्रियल प्लँटने बँक केलेल्या ऊर्जेचे त्यांच्या सुकेळी प्लँटसाठी समायोजन करण्याकरिता याचिका | ०६ एप्रिल, २०१६ |
| ३ | २०१५ चा ११६ | श्री. रक्षपाल ॲब्रोल, अध्यक्ष, भारतीय उधामी अवाम उपभोक्ता संघ, यांची सन २०११ च्या प्रकरण क्र. १५१ मधील दिनांक २२.०८.२०१२ च्या आदेशात दुरुस्ती करण्यासाठी याचिका | ०६ एप्रिल, २०१६ |
| ४ | २०१५ चा १४० | सन २०१४ च्या प्रकरण क्र. ११० मधून उद्‌भवणारी दंडात्मक कार्यवाही | ०७ एप्रिल, २०१६ |
| ५ | २०१५ चा ५१ | टाटा पॉवर कंपनीच्या वितरण व्यवसायाची आर्थिक वर्षे २०१५-१६ मधील किरकोळ वीज पुरवठयासाठीच्या संचालन व देखभाल खर्चाच्या सुधारित निकषांना मान्यतेसाठी याचिका | ०७ एप्रिल, २०१६ |
| ६ | २०१५ चा ४४ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. ने दि. २४.११.२००३ आणि ०३.०१.२०१३ चे आदेश, ग्राहक सनद आणि वितरण मुक्त प्रवेश विनियम, यांचा भंग केल्याबदल आवळे इंडस्ट्रिज प्रा. लि. ची याचिका | ११ एप्रिल, २०१६ |
| ७ | २०१५ चा ५३ | श्री. सर्जेराव रामराव वायल यांची त्यांच्या कृषी जमिनीवरील पारेषण कामाबदल नुकसानभरपाई मिळण्यासाठी याचिका | ११ एप्रिल, २०१६ |
